बुधवार, ४ जानेवारी २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक १६७
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## देशाच्या प्रगतीत विज्ञान-तंत्रज्ञानाचा वाटा -मोदी



**नवी दिल्ली** : येणार्‍या २५ वर्षांत भारत जी जी मोठी झेप घेईल त्यात विज्ञान-तंत्रज्ञानाचा वाटा महत्त्वाचा राहील, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. ते मंगळवारी (दि. ३) इंडियन सायन्स काँग्रेसच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठपरिसरात झालेल्या या कार्यक्रमात पंतप्रधान मोदी आभासी पद्धतीने उपस्थित होते, तर राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञानमंत्री जितेंद्र सिंह आणि रस्ते परिवहनमंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. भारतीय शास्त्रज्ञांनी केलेले संशोधन जगभरासाठी मार्गदर्शक ठरत आहे. भविष्यात भारतीय प्रयोगशाळेतील संशोधन जगाच्या गरजा पूर्ण करणार आहे, असा विश्वास या वेळी पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला.

अंतरंग

कोकण शिक्षक मतदारसंघात ३७ हजार ७१९ मतदार/२

आंबेनळी घाटातील दुरूस्तीच्या कामांना वेग/५

रणजी ट्रॉफी स्पर्धेत जयदेव उनाडकटने रचला इतिहास/८

# कडक बंदोबस्तात पोलीस भरती सुरू

## अलिबागेत उमेदवारांची गर्दी; पहिल्या दिवशी मैदानी चाचणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील शिपाई आणि चालक पदाच्या भरतीची प्रक्रिया मंगळवार (दि. ३)पासून सुरू झाली. पहिल्या दिवशी चालकपदासाठी पुरुष व महिला उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी व मैदानी चाचणी घेण्यात आली. कुठलाही गैरप्रकार किंवा अनुचित प्रथा रोखण्यासाठी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सकाळी ५.३० वाजल्यापासूनच उमेदवारांनी चाचणी केंद्रावर गर्दी केली होती. त्या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त होता. बायोमेट्रिक पडताळणी आणि कागदपत्रांची पडताळणी करून नंतरच उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी पाठविण्यात येत होते. प्रत्येक चाचणीचे व्हिडिओ चित्रीकरण केले जात होते.



शिवाय चाचणी केंद्राच्या परिसरात ७० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. योग्य ओळखपत्राशिवाय कुणालाही प्रवेश दिला जात नाही.

दिवसभरात सुमारे ८०० पुरुष व महिला उमेदवारांची चाचणी पूर्ण करण्यात आली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे स्वतः सर्व प्रक्रियेवर लक्ष ठेवून होते. उमेदवारांची कुठलीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जात होती. उमेदवारांना योग्य मार्गदर्शक सूचना दिल्या जात होत्या. जे उमेदवार उपाशीपोटी भरतीसाठी आले होते त्यांना योग्य आहार पुरवला जात होता. गरजू उमेदवारांच्या निवासाची व्यवस्थादेखील पोलीस दलातर्फे करण्यात आली आहे.

पोलीस शिपाईपदाच्या २७२, तर चालक पोलीस शिपाईपदाच्या सहा जागांकरिता ही भरती प्रक्रिया २२ जानेवारीपर्यंत चालणार आहे. त्यानंतर लेखी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर होईल. पात्र उमेदवारांना त्या तारखा कळवल्या जातील, असे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

दरम्यान, बंदोबस्तासाठी ५३ पोलीस अधिकारी, ३६७ पोलीस अंमलदार व २७ मंत्रालयीन कर्मचारी असे मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहेत.





(छाया : जितू शिगवण)

## भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांचे निधन



**पुणे : प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांचे दीर्घ आजाराने मंगळवारी (दि. ३) निधन झाले. ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्यावर पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

पिंपरी चिंचवड शहरातील महत्त्वाचे नेते म्हणून लक्ष्मण जगताप यांची ओळख होती. तेथील महापालिकेचे प्रतिनिधित्व करण्यापासून त्यांनी राजकारणाला सुरुवात केली. मनपाचे महापौरपदही त्यांनी भूषविले. २०१४ साली त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्याचवर्षी आणि त्यानंतर २०१९ असे दोन वेळा ते भाजपचे आमदार म्हणून निवडून आले. २०१७ साली महापालिकेत भाजपची सत्ता स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

गेल्या वर्षी मुंबईत राज्यसभा आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी पुण्याहून रुग्णवाहिकेने आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार मुक्ता टिळक आल्या होत्या. त्या वेळी भाजपने या दोघांच्याही त्याग आणि समर्पण वृत्तीचे कौतुक केले होते. काही दिवसांपूर्वीच आमदार मुक्ता टिळक यांचे निधन झाले. त्यानंतर हा दुसरा धक्का आहे. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री, पदाधिकारी यांनी शोकभावना व्यक्त केल्या आहेत. त्याचप्रमाणे भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी यांनीही श्रद्धांजली अर्पण केली आहे.

**आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि मनाला वेदना देणारे आहे. मी त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो. हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तस्वकीयांना, मित्रपरिवाराला लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. गेल्याच आठवड्यात मुक्ताताई टिळक आपल्यातून निघून गेल्या आणि आज लक्ष्मणभाऊ. पक्षाची मोठी हानी त्यांच्या जाण्याने झाली आहे.**

**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

## निवडक

### 'त्या' तरुणीवर लैंगिक अत्याचार झालेला नाही

**नवी दिल्ली** : कारच्या धडकेत मृत्यू झाल्यानंतर दुचाकीस्वार तरुणीला कारचालकाने काही किमी फरफटत नेल्याने तिचा मृत्यू झाला. तिच्यावर लैंगिक अत्याचार झाला नसल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले आहे. अंजली सिंग असे मृत तरुणीचे नाव आहे. तिचा मृत्यू रक्तस्त्राव, डोक्याला मार, पाठीचा कणा मोडल्याने झाला आहे, असे विशेष पोलीस आयुक्त सागर प्रीत हुड्डा यांनी सांगितले.

### बेधुंद काँग्रेस आमदाराचा भर स्टेजवरून गोळीबार

**भोपाळ** : मध्य प्रदेशातील काँग्रेस आमदार सुनील सराफ यांनी 'मैं हूँ डॉन' गाण्यावर नाचताना भर स्टेजवरून गोळीबार केल्याची घटना घडली. अनुप्पूर जिल्ह्यातील कोतमा शहरात नववर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात झालेल्या या प्रकाराचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मध्य प्रदेशचे गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांनी या घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी काँग्रेस आमदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उरण बोकडविरा येथे वृद्ध महिलेची हत्या

**उरण : प्रतिनिधी**



गुन्हे

उरण शहराजवळ असलेल्या बोकडविरा येथील वृद्ध विधवा महिलेची हत्या झाली आहे. ललिता ठाकूर (वय ६४) असे या महिलेचे नाव असून त्या एकट्याच राहात होत्या.

ललिता ठाकूर या बोकडविरा येथील खासगी शाळेत मोलमजुरी तसेच मालकीच्या तीनपैकी दोन खोल्या भाड्याने देऊन मिळणार्‍या उत्पन्नातून उपजीविका करीत होत्या. मंगळवारी (दि. ३) सकाळी शाळा उघडण्यासाठी चावी आणण्यास गेलेल्या कर्मचार्‍याला त्यांचे घर बंद दिसले. शेजार्‍यांनाही त्या दिसल्या नसल्याचे सांगण्यात आले. कुलूपबंद खोलीची खिडकी उघडली असता ही महिला जमिनीवर निपचित पडलेली दिसली. तिचे हातपाय रस्सीने करकचून बांधलेले होते. याबाबत माहिती मिळताच उरण पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

ललिताबाई यांच्याशी दोन दिवसांपूर्वी भाडोत्री अमोल सर्जेराव शेलार याचा वाद झाला होता. घटनेनंतर तो फरारी आहे. या वादातूनच खून झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात आंदोलन

### छत्रपती संभाजी महाराजांबद्दलच्या वक्तव्याचा पनवेलमध्ये निषेध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



छत्रपती संभाजी महाराज यांच्याप्रती केलेल्या वक्तव्याबद्दल विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात पनवेल भाजपच्या वतीने मंगळवारी (दि. ३) आंदोलन करण्यात आले. या वेळी घोषणाबाजी करून निषेध केला गेला.

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या या आंदोलनात माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी उपमहापौर सीताताई पाटील, चारुशीला घरत, भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे, माजी नगराध्यक्ष सुनील घरत, संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मुकीत काझी, मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, समीर ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुशीला घरत, राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, हेमलता म्हात्रे, रूचिता लोंढे, नीता माळी तसेच ज्योती देशमाने, अंजली इनामदार, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहराध्यक्ष रोहित जगताप, भाजप शहर खजिनदार संजय जैन, अमरीश मोकल, महिला मोर्चा शहराध्यक्ष वर्षा नाईक, सुहासिनी केकाणे, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, गौरव कांडपिळे, जितेंद्र तिवारी, सचिन पाटील, मयूर कदम, रूपेश नागवेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनात छत्रपती संभाजी महाराज हे स्वराज्यरक्षक होते, त्यांना धर्मवीर म्हणणे चुकीचे आहे, असे म्हटले होते. अजित पवार यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास माहिती नसणे ही गोष्ट दुर्दैवी आहे. त्यामुळे त्यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी भाजपकडून राज्यभर विविध ठिकाणी आंदोलन होत आहेत.

छत्रपती संभाजी महाराजांनी राष्ट्रधर्म, स्वधर्म आणि हिंदू धर्म या तीनही धर्मांचे रक्षण केले. त्यांना औरंगजेब धर्मांतर करायला सांगत होता, मात्र त्यांनी ते कधीच मान्य केले नाही. धर्मवीर संभाजी महाराजांच्या शरीराचे तुकडे केले तरी त्यांनी स्वधर्म आणि स्वराज्याची भाषा सोडली नाही. अजित पवार आणि त्यांच्यासारख्या विचारांच्या लोकांनी कितीही प्रयत्न केला तरी छत्रपती संभाजीराजे हे स्वराज्यरक्षक होतेच, शिवाय ते धर्मवीरदेखील होते हे लक्षात ठेवावे, अशी प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली तसेच अजित पवार यांनी माफी मागावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

## पनवेलमधील गुळसुंदेत स्ट्रॉबेरीचा यशस्वी प्रयोग

**रसायनी : प्रतिनिधी**

लहरी हवामानावर मात करण्यासाठी शेतकर्‍यांकडून वेगवेगळी पिके, उत्पादने घेण्याची गरज आहे, तरच त्यांचा आर्थिक स्तर उंचावेल. याचाच एक भाग म्हणून पनवेल तालुक्यातील गुळसुंदे येथे शेती संशोधक व प्रगतशिल शेतकरी मिनेश गाडगीळ यांनी ५० स्टॉबेरीची झाडे प्रयोग म्हणून लावली होती. त्यात त्यांना यश आले असून साधारण दीड महिन्यात फळ परिपक्व झाले आहे.

शेतीत सातत्याने संशोधन करणारे मिनेश गाडगीळ यांनी व्यावसायिक दृष्टिकोन न ठेवता केवळ प्रयोग म्हणून आपल्या हवामानात, मातीत हे उत्पादन होइल का हे पाहण्यासाठी स्ट्रॉबेरी लागवडीचा प्रयोग केला. तो यशस्वी झाला. योग्य प्रकारे खतमात्रा, फवारण्या व ड्रीप इरिगेशन, मल्चिंग यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची जोड घेतल्यास उत्तम उत्पादन येऊन शेतकर्‍यांना फायदेशीर असे उत्पादन घेता येइल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



(छाया : बी. एस. कुलकर्णी)

स्ट्रॉबेरीबरोबरच रब्बी हंगामात हरभरा, वाल, मुग, मटकीखेरिज राजमाचे पीक गाडगीळ यांनी घेतले. नोव्हेंबर महिन्यात वालाप्रमाणेच राजमाची लागवड केली असता एक महिन्यात त्यास शेंगा लागल्या. राजमाला दरही चांगला मिळतो. त्यामुळे शेतकर्‍यांनी हेही पीक घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

या वर्षीच खरीप हंगामात गाडगीळ यांनी लाल तांदुळ व आरएनआर तेलंगणा सोना हे तांदळाचे वेगळे वाण पूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने घेतले होते. एक गुंठ्याला साधारण ८२ किलो भात घेऊन परिसरातील सर्वांत जास्त उत्पादन घेण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. या तांदळाची ग्लॅयसेमिक इन्डेक्स कमी असल्याने डायबेटिस पेशंट या तांदळाचा भात खाऊ शकतात व या तांदळाला बाजारात भावही जास्त मिळतो.

मिनेश गाडगीळ यांना राज्य शासनाचा कृषिभूषण हा सन्मान प्राप्त झालेला असून शेतकर्‍यांनी सतत प्रयोगशील राहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे.

## आजपासून मुंबईत विश्व मराठी संमेलन

**मुंबई : प्रतिनिधी**

जगभरातील मराठीजनांनी एकत्र येऊन मराठी भाषेची गोडी वाढवावी या हेतूने मुंबईत वरळी येथे बुधवार (दि. ४) पासून तीन दिवस विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या उद्घाटन समारंभाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित राहणार आहेत. शिवाय राज्य मंत्रिमंडळातील सदस्य, काही प्रतिभावानांची विशेष उपस्थिती असेल.

## भाजप महिला मोर्चाची आढावा बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात मंगळवारी (दि. ३) महिला मोर्चाची आढावा बैठक झाली. या वेळी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

या बैठकीस पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चाच्या पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी उपमहापौर चारुशीला घरत, दक्षिण रायगड सरचिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती, प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रज्ञा धवन, रश्मी लुडबे, शिल्पा मराठे, अरुणा पाटकर, अंजली साळवी, आरती तायडे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, पनवेल शहराध्यक्ष वर्षा नाईक, भटके विमुक्त आघाडीच्या अध्यक्षा विद्या तामखडे, राखी पिंपळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

महिला मोर्चाच्या वतीने पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी व पक्षामार्फत होणारी विकासकामे घराघरापर्यंत पोहचवण्यासाठी महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. (पान २ वर..)



(छाया : योगेश पाटील)

# कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदारयादीत ३७ हजार ७१९ मतदार

## आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी नियोजन -डॉ. महेंद्र कल्याणकर



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदारयादी प्रसिध्द झाली असून कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये ३७ हजार ७१९ मतदार आहेत. तसेच या निवडणूकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असून याचा भंग होणार नाही याबाबत विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली. मंगळवारी कोकण भवनातील समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भारत निवडणूक आयोगाकडून १ नोव्हेंबर २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत कोकण शिक्षक मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. या घोषित कार्यक्रमानूसार कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी २३ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या यादीनूसार कोकण विभगात एकूण ३० हजार १६२ मतदार असून त्यापैकी १६ हजार ८२ स्त्री मतदार असून १४ हजार ८० पुरुष मतदार होते.

या मतदार याद्यांवर २३ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्राप्त झालेले दावे व हरकती निर्णीत करुन कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी ३० डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आली. या अंतिम यादीनूसार कोकण विभागात एकूण ३७ हजार ७१९ मतदार असून त्यापैकी १८ हजार ९७ स्त्री मतदार आहेत तर १९ हजार ६२२ पुरुष मतदार आहेत.

अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर भारत निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर २०२२ च्या परिपत्रकान्वये कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्याच दिवसापासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यमक्रमानूसार ५ जानेवारी २०२३ रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. १२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अखेरचा दिनांक असेल. १३ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येईल. १६ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक असेल. ३० जानेवारी रोजी मतदान होईल. मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ४ अशी असेल. २ फेब्रूवारी रोजी मतमोजणी केली जाईल आणि ४ फेब्रूवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली असेल.

आचारसहिंतेबाबत माहिती देताना आयुक्त डॉ. कल्याणकर म्हणाले, कोकण विभागात जिल्हास्तरावर आचारसंहिता स्थायी समितीची स्थापना करण्यात आली असून या समितीत जिल्हाधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. जिल्हास्तरावर तक्रार निवारण कक्ष, माध्यम प्रमाणीकरण व देखरेख समिती व भरारी पथक स्थापन करण्यात येत आहेत.

विभागीयस्तरावर चोवीस तास चालू असलेला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रसार माध्यमांनी निवडणूकीबाबत जनसामान्यांमध्ये जनजागृती करावी, असे आवाहन नवनियुक्त आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या पत्रकार परिषदेत केले.

# पोलादपूरात भाजपकडून पवार, आव्हाड यांचा निषेध

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान आणि औरंगजेबाची पाठराखणप्रकरणी विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजीमंत्री जितेंद्र आव्हाड यांचा मंगळवारी (दि. ३) दुपारी जाहीर निषेध केला.

छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज हे धर्मवीर नव्हते अशा बेताल वक्तव्य करणारे विरोधी पक्ष नेते अजित पवार आणि औरंगजेब क्रूर नव्हता असे बोलणारे जितेंद्र आव्हाड यांचा भारतीय जनता पार्टी पोलादपूर कडून जाहीर निषेध करण्यात आला.

या वेळी भारतीय जनता पार्टी शहराध्यक्ष राजाभाऊ दीक्षित, जिल्हा कार्यकारणी सदस्य तुकाराम केसरकर, तालुका सरचिटणीस समीर सुतार, युवा मोर्चा रायगड जिल्हा चिटणीस महेश निकम, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रतीक सुर्वे, शहर संघटक विश्वास नलावडे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस योगेश चव्हाण उपस्थित होते.




# खोपोलीत युवकाने केली आत्महत्या

### कारण गुलदस्त्यात; घटनेने बरगडे कुटुंबीय हादरले

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील श्रीरामनगर येथील वरदविनायक स्वर्ग या इमारतीत तळ मजल्यावर राहणाऱ्या जयेंद्र रामचंद्र बरगडे (३२) यांनी राहत्या घरी शयनकक्षात गळफास घेऊन आत्महत्या केली.

मिळालेल्या माहितीनुसार सकाळी जयेंद्र यांच्या शयनकक्षातून त्यांच्या पत्नी नाश्ता तयार करण्यासाठी स्वयंपाक घरात गेल्यानंतर जयेंद्र यांनी दरवाजा बंद केला व त्यानंतर ओढणीने गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली. एका मोठ्या कंपनीत बड्या पगारावर असणाऱ्या जयेंद्र यांच्या आत्महत्येने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलिसांचा तपास सुरू आहे पण आत्महत्याचे कारण अद्याप समजले नाही.

जयेंद्र यांचे नुकतेच १८ डिसेंबरला लग्न झाले होते अशी माहिती मिळत आह. नवीन वैवाहिक जीवनाची सुरुवात झाली होती मात्र अचानक मंगळवारी (दि. ३) सकाळी जयेंद्र यांनी आत्महत्या केली. बराच वेळ झाला दरवाजा बंद आहे म्हणून त्यांच्या पत्नीने दरवाजा उघडला असता समोरच मृतदेह पाहिला. त्यांनी असे का केले असावे? याबाबतही त्यांच्या कुटुंबीयांना प्रश्न पडला आहे. आत्महत्याचे कारण सध्या तरी गुलदस्त्यात आहे. या घटनेबाबत खोपोली पोलीस पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विरांबले पुढील तपास करीत आहेत. याबाबत सीआरपीसी १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

# तळेगाववाडीत कचरा वादातून दोन गटांत हाणामारी

### रसायनी पोलिसात परस्परविरोधी तक्रार

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

तळेगाववाडी गावात कचरा टाकण्यावरुन वाद होवून भाऊबंदकीच्याच दोन गटांत हाणामारी झाली. याबाबत रसायनी पोलिस ठाण्यात दोन्ही गटांनी आपापली तक्रार नोंद केली आहे.

याबाबत रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी कैलास रमेश मांडे (वय २९)व आरोपी अभिजित मांडे,आनंद मांडे, सुवर्णा मांडे यांच्यात रुमवरुन जुना वाद असून कचरा टाकण्यावरुन वाद होवून कैलास रमेश मांडे यांना अभिजित मांडे याने हाताबुक्यांनी मारहाण करून खाली पाडले व त्याच्या अंगावर बसले तर आनंद मांडे याने कैलासच्या डाव्या हाताच्या कोपऱ्यावर लाकडी फाट्याच्या दोन उपटी टाकल्या. त्यानंतर कैलास उभा राहिला असता अभिजित मांडे याने कैलासच्या डाव्या कानावर, डोक्यात लोखंडी रॉडने उपट मारुन दुखापत केली.

या वेळी कैलासचे काका जनार्दन मांडे हे भांडण सोडविण्यासाठी आले असता अभिजित मांडे याने त्याच्या नाकावर फाईट मारुन कैलासची आई व पत्नी यास सुवर्णा मांडे हिने हाताबुक्यांनी मारहाण करून धक्काबुक्की केली. आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे अभिजित मांडे याने तक्रारीत म्हटले आहे की, आरोपी कैलास रमेश मांडे, संगिता रमेश मांडे,रेष्मा कैलास मांडे यांना राग येवून त्यांनी अभिजित मांडे याच्या आईला शिविगाळ केली.म्हणून अभिजित भांडण सोडविण्यासाठी आले असता संगिता रमेश मांडे,रेष्मा कैलास मांडे यांनी अभिजितच्या आईला हाताबुक्यांनी मारहाण करून जनार्दन नारायण मांडे यांनी अभिजित मांडे यांना पकडून ठेवून कैलास मांडे याने अभिजितच्या लोखंडी रॉडने उजव्या कानावर डोक्यात उपट टाकली त्यामुळे अभिजित खाली पडल्याने त्याच्या डाव्या हाताला दुखापत झाली.

याबाबत कैलास मांडे गटावर भादवि कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रसायनी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलिस खाड्ये अधिक तपास करीत आहेत.

# स्त्री देहाचे विकृत प्रदर्शन रोखण्यासाठी पक्षभेद विसरून एकत्र या -चित्रा वाघ

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

समाजस्वास्थ्यासाठी स्त्री देहाचे विकृत प्रदर्शन करणे अयोग्य असल्यानेच उर्फी जावेदने सार्वजनिक ठिकाणी केलेल्या अंगप्रदर्शनाला विरोध करणे जरुरीचे आहे. अशा अंग प्रदर्शनातून आपण लेकी-बाळींपुढे कोणता आदर्श ठेवणार आहोत याचा विचार पक्षभेद विसरून सर्वांनी करावा. या विषयाचे राजकारण न करता सामाजिक स्वास्थ्य जपण्यासाठी सावित्रीमाईंचे संस्कार आणि छत्रपती शिवरायांचा आदर्श जपण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केले आहे.

वाघ यांनी पत्रकात म्हटले आहे, उर्फी जावेदने कोणता पेहराव करावा काय बोलावे याला आक्षेप नाही. माझा विरोध सार्वजनिक ठिकाणी अशा पद्धतीने अंगप्रदर्शन करण्याला आहे. आपण ज्या समाजात वावरतो तेथे अशा पद्धतीने शरीराचे हिडीस प्रदर्शन करणे योग्य आहे का? आपल्या घरातल्या लेकी बाळींपुढे अशा विकृतीचा आदर्श ठेवायचा का ? याचा विचार प्रत्येकाने करायला हवा. हा विषय राजकारणापलीकडचा आहे हे उर्फीचे समर्थन करणाऱ्यांनी लक्षात घेऊन माझ्या भूमिकेवर टीका करावी. रस्त्यावर खुल्या वातावरणात आपला पेहराव व्यवस्थित राखणं हे सामाजिक भान आहे. व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली असा स्वैराचार खपवून घेतला जाणार नाही.

# ९ जानेवारीला होणारा कोकण विभागीय लोकशाही दिन रद्द

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोंकण विभाग शिक्षक मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला असून, त्याबाबतची आदर्श आचारसंहिता दि. २९ डिसेंबर २०२२ पासून लागू झाली आहे. त्यामुळे ९जानेवारी २०२३ रोजी होणारा कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन रद्द करण्यात आला आहे, अशी माहीती प्र. तहसिलदार (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, नवी मुंबई यांनी एका प्रसिध्दी पत्रकातून दिली आहे.

# जयु भाटकर यांना मुंबै गौरव पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

जनाधार फाऊंडेशनने दूरदर्शन प्रसारण कार्यक्रम निर्मिती सेवेसाठी मुंबै गौरव पुरस्कार कला (प्रसारण माध्यम) हा पुरस्कार मुंबई दूरदर्शन केंद्राचे माजी सहाय्यक संचालक जयु भाटकर यांना देण्यात आला. या वेळी यांनी हा पुरस्कार मुंबई दूरदर्शन केंद्र सह्याद्री वाहिनीतील समस्त परिवाराला अर्पण करत असल्याचे सांगितले.




मुंबईत शिवाजी मंदिर येथे झालेल्या जनाधार फाऊंडेशनच्या मुंबै महोत्सवात पहिल्या दिवशीच्या पुरस्कार वितरण समारंभ झाला. जनाधार फाऊंडेशनचे अध्यक्ष राजेश खाडे आणि आमदार सुनील शिंदे यांच्या उपस्थितीत जयु भाटकर यांना यंदाचा मुंबै गौरव पुरस्कार सन्मान चिन्ह आणि सन्मान पत्र देऊन वितरीत करण्यात आला.

पान १ वरून

## भाजप महिला मोर्चाची आढावा बैठक

या उपक्रमांतर्गत धन्यवाद मोदीजी कार्ड, एसईओचे फॉर्म भरणे, सोशल मीडियाच्या माध्यामातून अधिकाधिक प्रभावीपणे काम करण्याच्या दृष्टिकोनातून ट्विटर आणि फेसबुकवर अकाउंट बनवणे तसेच व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप तयार करून संघटना मजबूत करण्याचे उपक्रम महिला मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांमार्फत राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत ही आढावा झाली. या वेळी जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांनी उपस्थित महिलांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले तसेच कामाचा आढावा घेतला.

दरम्यान, पिंपरी चिंचवड मतदारसंघाचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांचे मंगळवारी निधन झाल्याने त्यांना महिला मोर्चाच्या वतीने या वेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.

# जैन समाज आज मुंबईत एकवटणार

**मुंबई : प्रतिनिधी**

जैन समाजाचे पवित्र तीर्थस्थान असलेल्या झारखंडमधील श्री सम्मेद शिखरजी या ठिकाणाला पर्यटनस्थळ घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तो रद्द करून जैन धार्मिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावे या मागणीसाठी सकल जैन समाजाच्या वतीने बुधवारी (दि. ४) सकाळी ९ वाजता मुंबईतील आझाद मैदानात मूक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या वेळी मेट्रो सिनेमागृहापासून विशाल रॅली निघेल. यात दिगंबर जैन समाज, श्वेतांबर तेरापंथी समाज, श्वेतांबरी स्थानकवासी समाज तसेच श्वेतांबर मूर्तीपूजक समाजातील जैन बांधव सहभागी होतील, अशी माहिती संयोजक सुजित खोलापुरे यांनी दिली.

# सुपारी संघाची निवडणूक रंगतदार होणार

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक ५ जानेवारी रोजी होणार आहे. सहा जागा या बिनविरोध आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित राहिलेल्या ११ जागांसाठी मतदान सुपारी संघातच होणार आहे. परिवर्तन पॅनल विरुद्ध नारळ सुपारी बागायतदार यांच्यात लढत होणार आहे.

या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्पात आला असून दोन्ही पॅनल बागायतदार यांच्याशी संपर्क साधून मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. सुपारी खरेदी संघात आपले वर्चस्व असावे यासाठी दोन्ही गट खूप मेहनत घेताना दिसत आहेत. सध्या पत्रक काढून आपली ध्येधोरणे पटवून देण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यामुळे पत्रकबाजीला सुद्धा जोर आला आहे. सुपारी संघाचा प्रचार अंतिम टप्पात असून आपल्या गटाचे वर्चस्व रहावे यासाठी दोन्ही गटाचे भगीरथ प्रयत्न सुरु आहेत. या निवडणुकीत सुपारी खरेदी विक्री संघाचे १३०६ सभासद असून ते आपल्या मतदानाचा अधिकार बजावणार होते. सहकारी तत्वावर स्थापन झालेला हा सुपारी संघामुळे स्थानिक लोकांना सुद्धा मोठा रोजगार प्राप्त झाला आहे. मुरुड तालुक्यातील सुपारीचे पीक घेणाऱ्या बागायतदारांना चांगला भाव मिळवून देण्याचे काम सुपारी संघातर्फे होत असते. दर पाच वर्षांनी या संघाची सार्वत्रिक निवडणूक होत असते. १७ संचालक विविध भागातून निवडून दिले जात असतात. निवडून आलेल्यामधून चेरमनपदाची निवड होत असते. आता उमेदवारांचे भवितव्य बागायतदारांच्या हाती असून त्याची मते मतपेटीत टाकली जाणार आहेत. मुरुड तालुका सुपारी खरेदी विक्री संघाची निवडणूक सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक तरमेस अमरचंद सहगल या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर बिनशेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौज नढाळ, तालुका खालापुर, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | भुमापन नं./उपविभाग. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| नढाळ | ५१/१/अ | ०-११-६० | १.१८ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ .यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पनवेल
दिनांक - ०३/०१/२०२३

सही/-
ॲड. श्री. दीपक आर. शेळके
पत्ता : डी -३/१, किनारा हौ. सो., बावन बंगलो, ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.
मो.नं. ९८२०७९५६०५



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांने प्रस्ताविक जमीन मालक सुर्याजी तानाजी भोईर या जमीन मालकाकडुन विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर बिनशेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**बिनशेती मिळकतीचे वर्णन**
**मौज रीस, तालुका खालापुर, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | भुमापन नं./उपविभाग. | क्षेत्र आर. चौ. मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| रीस | २२/१/अ | २१-००-८० | २१०.०० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या बिनशेती जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पनवेल
दिनांक - ०३/०१/२०२३

सही/-
ॲड. श्री. दीपक आर. शेळके
पत्ता : डी -३/१, किनारा हौ. सो., बावन बंगलो, ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.
मो.नं. ९८२०७९५६०५

# पनवेल परिसरात अजित पवारांचा निषेध

## भाजपचे ठिकठिकाणी आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हिवाळी अधिवेशनात संभाजी महाराज हे स्वराज्यरक्षक होते, त्यांना धर्मवीर म्हणणे चुकीचे आहे, असे म्हटले होते. अजित पवार यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास माहिती नसणे, ही गोष्ट दुर्दैवी आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी भाजपकडून राज्यभर विविध ठिकाणी आंदोलन होत आहेत. पनवेलसह कळंबोली, कामोठे, करंजाडे येथे भाजपच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले.

करंजाडे येथे मंगळवारी (दि. ३) भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ व भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत अजित पवार यांनी केलेल्या वक्तव्याचा निषेध करीत आंदोलन करण्यात आले. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, समिना साठी, राजेंद्र पाटील, पनवेल पं. स. माजी सदस्य भूपेंद्र पाटील, शांताराम पाटील, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, करंजाडे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, अनिष ढवळे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, प्रीती सहारे, देवकु वाघे, नंदू भोईर, बिपीन गायकवाड, अनिश साबळे, सुरज शेलार, सुनील भोईर, तुषार नागे, प्रिया फडके आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



करंजाडे

भाजप कळंबोली मंडलच्या वतीने मंगळवारी विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याविरोधात कळंबोली शहरामध्ये आंदोलन करण्यात आले. या वेळी कळंबोली शहर मंडळाचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते, महिला मंडळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यासोबतच कामोठे येथेही मंगळवारी आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालय व भाजपा मध्यवर्ती कार्यालय कामोठे तसेच सेक्टर ३५ कामोठे पोलीस स्टेशन समोर अजित पवार यांच्या विरोधात मोर्चा काढला होता. या वेळी कामोठे मंडल अध्यक्ष रवी जोशी, महामंत्री सुशीलकुमार शर्मा, युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष वनिता पाटील, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, रवी गोवारी, भाऊ भगत, राजेश गायकर, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष नाना मगदूम, जिल्हा कार्यकारणी सदस्य रवींद्र अभिमाने, विद्या तामखेडे, युवा मोर्चा उपाध्यक्ष तेजस जाधव, नवनाथ भोसले, रावसाहेब बुढे, आदी उपस्थित होते.


कामोठे



कळंबोली

(छाया : अक्षय शार्दुल)

## आकुळवाडीजवळ रेल्वे अपघातात एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कराडे खुर्द येथील संतोष रामचंद्र दाभणे (वय ४५) यांचा रेल्वे अपघातात गंभीर मृत्यू झाला असल्याने कराडे गावात शोककळा पसरली आहे.



याबाबत रसायनी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आपटाजवळ आकुळवाडी येथील पेण ते पनवेल रेल्वे टॅकवरील स्टोन नंबर ८०/२१ ते ८०/२३ च्या दरम्यान पेण बाजूकडून पनवेल बाजूकडे जाणाऱ्या रेल्वेची धडक लागून संतोष रामचंद्र दाभणे (वय ४५) यांच्या डोक्यास व शरीरास गंभीर दुखापती होऊन अपघातात संतोष दाभणे जागेवर गतप्राण झाले.

याबाबत त्यांचा मुलगा साहिल संतोष दाभणे यांनी रसायनी पोलिसांना माहिती दिली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक अश्वनाथ बप्पाजी खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनाजी काळे तपासिक अंमलदार म्हामुणकर यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मयत संतोष दाभणे यांचे शवविच्छेदन करण्यात आले. याबाबत रसायनी पोलीस अधिक तपास करीत असून याबाबत पोलीस ठाण्यात सीआरपीसी १७४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.



**रसायनी : पाताळगंगा पुलावर पडलेल्या भगदाडाबाबत रसायनी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल भोळे, बी. एस. कुलकर्णी, नागेश कदम यांनी पाठपुरावा केला होता. त्यानुसार येथील भगदाड तातडीने बुजविण्यात आले आहे.**

## दिघाटीच्या सरपंच रजनी ठाकूर यांनी स्वीकारला पदभार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिघाटी ग्रामपंचायतीच्या भाजपच्या सरपंचपदी रजनी हिरामण ठाकूर या थेट नागरिकांमधून निवडून आल्या आहेत. सोमवारी (दि. २) त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी फोनवरून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

रजनी ठाकूर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, पनवेल तालुका भाजपाचे उपाध्यक्ष संजय टेंबे, कांदिवलीचे ज्येष्ठ नेते वसंत देसाई, माजी सरपंच अमित पाटील, भाजप नेते चांगाजी पाटील, माजी उपसरपंच दत्ताशेठ पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य वैशाली पाटील, जेष्ठ नेते दयानंद ठाकूर, केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, माजी ग्रामपंचायत सदस्य राजेश गावंड, माजी ग्रामपंचायत सदस्या स्मिता ठाकूर, माजी ग्रामपंचायत सदस्य मनोहर पाटील, राजेश ठाकूर, भाजप कार्यकर्ता मच्छिंद्र पाटील, विकास पाटील, केळवणे माजी ग्रामपंचायत सदस्य सुशिल ठाकूर, केळवणे भाजप गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, भाजप कार्यकर्ता रामदास ठाकूर, राजाराम पाटील, राकेश पाटील, कैलास पाटील, हनुमान पाटील, दिघाटीचे पोलीस पाटील चंद्रकांत पाटील, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

दरम्यान, या वेळी सुनील बामा गावंड उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांचेही उपस्थित सर्वांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : तालुक्यातील आकुर्ली येथे गावदेवी महिला मंडळाच्या वतीने श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ यांनी भेट देत दर्शन घेतले. सोबत माजी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील व अन्य.**



**पनवेल : विहिघर येथील लक्ष्मीनगर सोसायटीमध्ये दरवर्षीप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे या सप्ताहाचे चौथे वर्ष आहे. या सप्ताहाला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी माजी पं. स. माजी सदस्य भूपेंद्र पाटील, भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते शांताराम पाटील यांच्यासह भाविक उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)

## तरुणीचा अपघाती मृत्यू

**पनवेल :** मित्रांसोबत ट्रेकिंगसाठी जाणाऱ्या तरुणीच्या स्कूटीला खारघर येथे भरधाव ट्रकने धडक दिली होती. या अपघातात एका तरुणीचा मृत्यू झाला असून पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतले आहे.

ताडदेव (मुंबई) येथे राहणारी श्रुती दळवी (वय २०) तिचा मित्र तेजस वाघमोडे, प्रीतम पाटील व साईली शिंदे यांच्यासह नेरळ येथील पेप कोर्ट येथे ट्रेकिंगला जाण्यासाठी निघाले होते. श्रुती व तेजस हे दोघे एका स्कूटीवर; तर प्रीतम आणि सायली हे दोघे दुसऱ्या मोटरसायकलवरून जात होते. सायन-पनवेल मार्गावरील खारघर टोल नाक्याजवळ भरधाव जाणाऱ्या ट्रकने तेजस व श्रुती यांच्या स्कुटीला धडक दिली होती. या अपघातात श्रुतीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## करंजाडेच्या उपसरपंचपदी भाजपचे सागर आंग्रे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत करंजाडे ग्रामपंचायतीमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले. थेट सरपंच पदाचे उमेदवार मंगेश शेलार यांच्या पारड्यात जनतेने कौल दिल्यानंतर करंजाडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदीही भाजपने बाजी मारली. उपसरपंचपदासाठी सागर आंग्रे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने सागर आंग्रे बिनविरोध निवडून आले आहेत.

सरपंच मंगेश शेलार, निवडणूक निरीक्षक तथा नायब तहसीलदार राहुल सूर्यवंशी, सुभाष राठोड, ग्रामविकास अधिकारी प्रेमसिंग गिरासे यांच्या देखरेखीखाली उपसरपंचपदाचा निवडणूक कार्यक्रम सोमवारी झाला. उपसरपंच पदासाठी सागर आंग्रे यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र प्राप्त झाल्याने सागर आंग्रे बिनविरोध निवडून आले आहेत.



या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, भाजप विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य सुरज शेलार, बिपिन गायकवाड, नंदकुमार भोईर, प्रीती शहारे, अनिता भोईर, शिल्पा नागे, अतिष साबळे, कल्पना गायकर, प्रिया फडके यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

करंजाडेचे अनेक प्रलंबित प्रश्न असून ते अद्यापही सुटले नसल्याने जनतेने आम्हाला काम करण्याची संधी दिली आहे. आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून या प्रश्नांबाबत पाठपुरावा केला जाईल आणि जनतेने आम्हाला विश्वासाने काम करण्याची संधी दिली असून त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही सरपंच मंगेश शेलार यांनी दिली. तर पक्षाने दिलेली जबाबदारी पूर्णत्वास नेऊ व पुढील काळात जास्तीत जास्त विकासकामे करण्याच्या दृष्टिकोनातून पाऊले उचलली जातील असे नवनिर्वाचित उपसरपंच सागर आंग्रे यांनी सांगितले.

> **गेली पाच वर्षे करंजाडेचा विकास खुंटला होता, परंतु जनतेने भाजपवर विश्वास ठेवून परिवर्तन घडवले. करंजाडेतील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासह नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करण्यात येणार असून गावात सीसीटीव्हीची संख्या वाढवण्यात येणार आहे.**
>
> **-विनोद साबळे, जिल्हा सरचिटणीस, भाजप**

## सीकेटी महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने सोमवारी (दि. ३) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९२वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू.ए.सी.चे समन्वयक, डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर, महिला विकास कक्षाच्या अध्यक्ष डॉ. आर. डी. म्हात्रेव इतर प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी महाविद्यालच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली तसेच आज महिलांना प्रतिष्ठापूर्ण जीवनाचा दर्जा सावित्रीबाई फुले यांनी प्राप्त करून दिला. त्यामुळेच आज सर्व क्षेत्रात महिलांचा वावर पहावयास मिळतो असे सांगून उपस्थितांना उद्बोधित केले. प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले,तसेच उपस्थित प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही अभिवादन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता प्रा. एस. एम. हुद्दार आणि प्रा. बी. ए. भोईर, श्री. पी. के. गोंधळी आणि श्री. तानाजी देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## गव्हाण विद्यालयात सावित्रीबाई फुलेंना अभिवादन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी व समस्त स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाची पहाट निर्माण करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९२वी जयंती रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजन छत्रपती विद्यालयातील सावित्रीच्या लेकींनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विद्यालयातील उपशिक्षिका द्रौपदी वर्तक यांनी सावित्रीबाईंचा जीवनपट भाषणाद्वारे विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थिनींनी गायलेलं सावित्री नमन! या गीतासाठी तबलावादन इयत्ता नववीतील विद्यार्थी श्रवण गडकरी ह्याने. तर त्याला हार्मोनियमची साथ दिली इयत्ता पाचवी ब मधील याज्ञिक मोकल या विद्यार्थ्याने केले.

विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा.बाबुलाल पाटोळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व उपशिक्षिका यांनी या कार्यक्रमास हजेरी लावली. इयत्ता पाचवी क च्या वर्गा तर्फे हा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग सहायक हर्षला पाटील यांनी केले.

## संपादकीय

# असंवेदनशीलतेचा बळी

निर्भया, श्रद्धा यांच्यानंतर देशाची राजधानी दिल्लीतून आणखी एक हृदय पिळवटून सोडणारी घटना समोर आली. या घटनेचे स्वरूप थोडे वेगळे आहे. दुचाकीस्वार तरुणी अपघातानंतर मद्यधुंद तरुणांच्या कारखाली आली असता तिला काही किमी फरफटत नेल्याने तिचा मृत्यू झाला. याबद्दल हळहळ आणि संताप व्यक्त होत आहे.

**अवघा देश सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात दंग असताना राजधानी दिल्लीत धक्कादायक घटना घडली. एका कारने दुचाकीस्वार तरुणीला धडक दिली आणि त्यानंतरही कारमधील तरुणांनी आपली गाडी न थांबवता सुरूच ठेवली. काही किमीपर्यंत गाडीखाली फरफटत असल्याने तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. या तरुणीच्या अंगावरील सर्व कपडेही फाटले होते. रस्त्याच्या मधोमध नग्नावस्थेत तिचा मृतदेह आढळला. या प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपी मद्यधुंद असल्याची माहिती समोर आली आहे. हा एक अपघात होता असे मानले तरी त्या वेळी कारमधील तरुणांनी गाडी थांबवून काय झाले हे पाहणे आवश्यक होते, मात्र त्यांनी ते सौजन्य दाखविले नाही. उलट गाडी सुरूच ठेवली. त्यामुळे अपघातग्रस्त तरुणी त्या गाडीखाली फरफटत गेली. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार पोलीस तपासात काही गोष्टी समोर आल्या आहेत. त्यानुसार गाडी चालविणाऱ्या तरुणाला अपघातानंतर काही अंतर गाडी चालविल्यावर गाडीखाली काहीतर अडकले आहे असे वाटले. याबाबत त्याने इतर चौघांना सांगितले तेव्हा त्यांनी काहीही नाही, गाडी चालवित राहा, असे म्हटले. यावरून आरोपींची असंवेदनशीलता स्पष्ट होते. शिवाय एवढ्या लांब ही तरुणी फरपटत जात असताना कुणाचेही तिच्याकडे कसे लक्ष गेले नाही, हाही प्रश्न उपस्थित होतो. दरम्यान, अपघात झाला तेव्हा तरुणीची मैत्रीण तिच्यासोबत होती असा खुलासा सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून झाला आहे. अपघातानंतर ती घटनास्थळावरून निघून गेली होती. तिच या प्रकरणातील मुख्य साक्षीदार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशीचे आदेश दिले आहेत. मयत तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. पीडितेला न्याय मिळावा या मागणीसाठी स्थानिकांनी सुलतानपुरी पोलीस ठाण्याबाहेर निदर्शनेही केली. तरुणीच्या शवविच्छेदन अहवालात तिच्यावर बलात्कार झाल्याचा उल्लेख नसल्याचे समजते. ही तरुणी एका कंपनीत कामाला होती आणि घरी परतत असताना अपघात झाला. गेल्या वर्षी तिच्या वडिलांचे निधन झाल्यापासून ती घर चालवत होती. तिची आई सध्या डायलिसीसवर आहे. आईसह बहिणी-भावांचे पालनपोषण तरुणी करीत होती. तिच्या मृत्यूमुळे कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकवेळ या कुटुंबाला भरपाई मिळेल, पण तिच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झालीय ती कशी भरून निघणार? या भीषण अपघाताच्या सीसीटीव्ही फुटेजमधून हा प्रकार किती भयंकर होता ते समजते. अपघातानंतर फरार झालेल्या आरोपींना कारच्या नंबरवरून पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांनी ही भाड्याने घेतली होती असे उघड झाले आहे. आणखी काही गोष्टींवर प्रकाश पडणे बाकी आहे. पोलिसांनी या संपूर्ण घटनेचा सखोल तपास करून आरोपींना कठोर शिक्षा मिळाली पाहिजे यासाठी पुरावे गोळा केले पाहिजेत. मग न्यायालय पुढची प्रक्रिया पूर्ण करेल.**

# महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना



आरोग्य सेवांचा मूळ उद्देश आरोग्य सुधारणे हा असून लोकांचे जीवनमान सुधारावे व निरोगीपणे जगता यावे यासाठी आरोग्य शिक्षण व सेवा यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य सेवा ही सामाजिक आरोग्य क्षेत्र, यात प्राथमिक आरोग्य सेवा, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रुग्णालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचाही समावेश होतो. या माध्यमातून लोकांना आरोग्य सेवांची उपलब्धता करून देण्यात येते. सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून शासनाच्या वतीने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना आखण्यात आलेल्या आहेत. या आरोग्य सेवा अधिकाधिक लोकाभिमुख झाल्यास लोकांना चांगले आरोग्य लाभून समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी नक्कीच मदत होऊ शकते. सामाजिक क्षेत्राबरोबरच स्वयंसेवी संस्था व खाजगी क्षेत्र या माध्यमातून अंगीकृत रुग्णालयातून आपल्या सेवा या देत असतात, त्या सेवांशीही शासन सामाजिक आरोग्य क्षेत्राशी जोडण्याचा प्रयत्न करीत आलेले आहे.

निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने विविध महाआरोग्य योजना सामान्य माणसासाठी शासनाच्या वतीने साकारलेल्या आहेत. या लोककल्याणकारी योजनांची माहिती देऊन लोकांनी त्याचा अधिकाधिक उपयोग घेण्यासाठी व त्या लोकाभिमुख करण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे, यासाठी सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत त्याचप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे यांचेदेखील मोलाचे मार्गदर्शन मिळत आहे, असे मनोगत आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई च्या संचालक, डॉ. साधना तायडे तसेच आरोग्य सेवा, पुणे चे संचालक, डॉ.नितीन अंबाडेकर यांनी नोव्हेंबर-२०२२ च्या महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेच्या महाआरोग्य योजना-सार्वजनिक आरोग्य योजना व कार्यक्रम या विशेषांकातून व्यक्त केले आहे.

या पुस्तिकेचे संपादन डॉ.कैलास बाविस्कर यांनी केले आहे. चला तर जाणून घेवूया काय आहेत या आरोग्य योजना, काय आहेत या योजनांचे लाभ. नियमित लसीकरण कार्यक्रम बालमृत्यू आणि त्यांच्यामधील आजारांचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांचे योग्य संपूर्ण लसीकरण करणे ही अत्यंत सोपी, कमी खर्चाची पण अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे.

बालकांमधील क्षयरोग, घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफिलस इन्फ्लुएन टाईप बी, पोलिओ, सबील गोवर व रुबेला या आजारांमुळे होणारे आजारपण व मृत्यू कमी करणे हे नियमित लसीकरण कार्यक्रमाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत बीसीजी लस क्षयरोगाकरिता, डीपीटी लस ही घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला या आजारांकरिता, पोलिओ लस पोलिओ आजारांकरिता, गोवर-रुबेला लस गोवर व बेला आजारांकरिता, हिपॅटायटिस बी लस कावीळ आजारांकरिता व पेंटाव्हॅलंट लस ही घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफिलस इन्फलुएन्झा टाईप बी व कावीळ या आजारांकरिता प्रतिबंधात्मक साधन म्हणून उपयोगात आणल्या जातात.

लसीकरण कार्यक्रमासाठीचे अनुदान केंद्र शासनाकडून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत प्राप्त होते. कार्यक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक लसी व ए.डी. सिरीज यांचा पुरवठा केंद्र शासनाकडून केला जातो. सर्व आरोग्य संस्थांमध्ये तसेच वायसंपर्क कार्यक्षेत्रात लसीकरण सत्राचे आयोजन करण्यात येते व लाभार्थीना लसी दिल्या जातात. लसींची क्षमता टिकून राहण्यासाठी लसींची वाहतूक शीतसाखळी अबाधित ठेवून करण्यात येते. जापनिज एन्सेफेलायटिस लस ही जापनिज एन्सेफेलायटिस देण्यात येते.

राज्यात राष्ट्रीय नियमित लसीकरण कार्यक्रमांतर्गत पेंटाव्हॅलेन्ट लसीचा समावेश दि. २२ नोव्हेंबर २०१५ रोजी करण्यात आला आहे. या लसीमुळे घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, हिमोफिलस इन्फलुएन्झा टाईप बी व कावीळ या ५ आजारांना व त्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांना प्रतिबंध होणार आहे.

उद्दिष्ट- लसीकरणामुळे टाळता येणाऱ्या आजाराने होणाऱ्या बाल मृत्यूचे व आजाराचे प्रमाण लसीकरणाने कमी करणे.

बालकांचे योग्य वयात लसीकरण पूर्ण करणे. सेवा देणाऱ्या आरोग्य संस्था- राज्यात प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, स्त्री रुग्णालये, सामान्य रुग्णालये, रुग्णालये आणि निमशासकीय संस्था यांच्यामार्फत कार्यक्रमाची अंमलबजावणी केली जाते.

मानव विकास कार्यक्रम राज्यातील १२ जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरिता २९ जून २००६ च्या शासन निर्णयान्वये मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली होती. सन २०११-१२ पासून १९ जुलै २०११ च्या शासन निर्णयान्वये मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती २१ जिल्ह्यातील १२५ तालुक्यांपर्यंत वाढविण्यात आली. या योजनेंतर्गत ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या २३ जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे. १२ जुलै २०१२ च्या शासन निर्णयान्वये मानव विकास कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच या कार्यक्रमाचा लाभ अधिकाधिक लोकांना मिळावा, या उद्देशाने मानव विकास कार्यक्रम सन २०१२-१३ पासून १५ जिल्हयांतील 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात मानव विकास कार्यक्रम अंमलबजावणी सुरुवात केली आहे. उद्देश- २३ जिल्ह्यांतील १२५ तालुके व १५ जिल्ह्यांतील ४३ 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये मानव विकास निर्देशांक वाढविणे. उद्दिष्टे- माता मृत्यू कमी करणे, अर्भक मृत्यू कमी करणे, धोक्याच्या मातांना संदर्भित करणे व गरोदर मातांना बुडीत मजुरीचा लाभ देऊन आर्थिक मदत करणे. कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना- मानव विकास कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबिरे प्राथमिक आरोग्य केंद्र, नगरपालिका क्षेत्रांत आयोजित केली जातात. या शिबिरांमध्ये स्त्रीरोग तज्ञांकडून गर्भवती महिलांची व स्तनदा मातांची आरोग्य तपासणी व औषधोपचार केला जातो.

तसेच बालरोग तज्ञांकडून ते ६ महिने वयोगटातील बालकांची व ६ महिने ते २ वर्ष वयोगटातील बालकांची तपासणी व औषधोपचार केला जातो. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील गरोदर महिलेला बुडीत मजुरीपोटी रु.४ हजार इतका लाभ दिला जातो. हा लाभ गरोदरपणाच्या सातव्या ते नवव्या महिन्यात रु. २ हजार आणि प्रसूतीनंतर एक महिन्याच्या आत रु.२ हजार अशा प्रकारे दिला जातो. किशोरवयीन मुलींना पौगंडावस्थेतील आरोग्य व जीवन कौशल्ये विकसित करण्याबाबत आरोग्य शिक्षण देणे. मानव विकास कार्यक्रमांतर्गातील शिबिरे प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर दर महिन्याला दोन व 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात दर महिन्याला एक याप्रमाणे आयोजित केली जातात.

शिबिराच्या आयोजनासाठी एकूण रु. १८ हजार प्रति शिबिर अनुदान मंजूर आहे. यामध्ये तज्ञ डॉक्टरांचे मानधन व वाहतूक यासाठी रु. ५ हजार, लाभार्थीच्या जेवणाकरिता रु.५ हजार २०० पेंडालकरिता रु.१ हजार ५०० आणि तातडीची औषधे व प्रयोगशाळा साहित्याकरिता रु. १ हजार ३०० आणि वाहनखर्चासाठी रु. ५ हजार रुपयांचा समावेश आहे. या लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय arogyapatrikamhgmail.com या ई-मेलवर तसेच पत्रव्यवहारासाठी मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे-४११००६ येथे संपर्क साधावा.

**-मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड-अलिबाग

## बदलते तंत्रज्ञान

# नववर्षापासून बंद होताहेत नियमबाह्य वॉटर हिटर



वॉटर हीटरचा वापर करणाऱ्यांसाठी एक बातमी आहे. १ जानेवारी २०२३ पासून वॉटर हीटरसंबंधी केंद्र सरकारने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे. नियमांचे पालन न करणारे वॉटर हीटर बंद करण्यात येणार आहे.

जर तुम्ही तुमच्या घरात Electric Water Heater चा वापर करीत असाल तसेच तुम्ही नवीन गीझर खरेदी करण्याचा विचार करीत असाल तर ही माहिती तुमच्यासाठी आहे. लवकरच मार्केटमधून वॉटर हीटर गायब होणार आहेत. ही माहिती उर्जा मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. मंत्रालयाने म्हटले की, १ जानेवारी २०२३ पासून वॉटर हीटर १ स्टार रेटिंगचे असतील त्याला वैध मानले जाणार नाही. म्हणजेच तुम्ही १ स्टार रेटिंगचे वॉटर हीटर खरेदी करण्याचा प्लान बनवत असाल तर ते नवीन वर्षापासून हे हीटर मान्य होणार नाहीत.

मंत्रालयाने एक नोटिफिकेशन जारी केले आहे. ज्यात एक टेबल सुद्धा दिला आहे. या टेबलमध्ये याची पूर्ण प्लानची माहिती दिली आहे. मंत्रालयाकडून काही वॉटर हीटर्सची लिस्ट जारी केली आहे. ज्यात स्टार रेसिंगचे वॉटर हीटर आहेत. या ठिकाणी सांगितले की, या वॉटर हीटर्सची वैधता १ जानेवारी २०२३ पासून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असणार आहे.

या सोबत हे स्पष्ट होते की, जे वॉटर हीटर या लिस्टमध्ये आपली जागा बनवणार नाहीत. ते पुढील वर्षापासून वैध मानले जाणार नाहीत. ज्याला वैधता बाहेर ठेवण्यात आले आहे. ते सर्व १ स्टोर रेटिंग सोबत येतात. ते सर्व वॉटर हीटर ६ लीटर ते २०० लीटरच्या स्टोरेजचे आहेत. याचा थेट अर्थ असा आहे की, इलेक्ट्रिक वॉटर हीटर आगामी काळात वैध नसणार आहेत. याच प्रमाणे हीटर्सची एनर्जी परफॉर्मन्स लेवलला अपग्रेड करण्याची गरज असते.

# कवयित्री आणि कथालेखिका इंदिरा संत



## निमित्त

शिक्षकीपेशा स्वीकारलेल्या इंदिरा संतांनी लहान मुलांच्या कथा लिहून आपल्या लिखाणाला प्रारंभ केला. १९५०च्या दशकात त्यांनी स्त्रीवादी कविता लिहण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. आई, पत्नी, मुलगी या नात्यांतून भारतीय स्त्रीचे दिसणारे खडतर जीवन त्यांनी आपल्या कवितांमधून हळुवारपणे मांडले आहे. इंदिरा संत आणि त्याचे पती नारायण संत या दोघांच्या कवितांचा एकत्रित असा संग्रह 'सहवास' या नावाने १९४०ला प्रसिद्ध झाला. दुर्दैवाने ना. मा. संत यांचे १९४६ साली निधन झाले. वेळीच सावरून या घटनेचा इंदिरा संत यांनी आपल्या कवितेवर परिणाम होऊ दिला नाही. विशुद्ध रूपातील इंदिरा संत यांची कविता टीकाकार तसेच काव्यरसिकांनी उचलून धरली. आजमितीस इंदिरा संत यांची सुमारे पंचवीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. रमेश तेंडुलकर यांनी इंदिरा संत यांच्या निवडक कविता 'मृण्मयी' नावाने १९८२ साली संपादित करून प्रसिद्ध केल्या.

### जन्म आणि शिक्षण

पूर्वाश्रमीच्या इंदिरा दीक्षित असलेल्या इंदिरा संत यांचा जन्म जानेवारी ४ १९१४ रोजी कर्नाटकातील इंडी या गावी झाला. कोल्हापूर व पुणे येथून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बी. ए., बी.टी. डी. व बी. एड. या पदव्या प्राप्त केल्यानंतर बेळगावच्या ट्रेनिंग कॉलेजात अध्यापिका म्हणून काम पाहण्यास त्यांनी सुरुवात केली. या कॉलेजात त्यांनी १९५६ ते १९७४ या काळात प्राचार्यपद देखील भूषवले.

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातील सहाध्यायी नारायण संत यांच्याशी त्या १९३५ साली विवाहबद्ध झाल्या.

### व्यक्तिमत्त्व आणि जीवनप्रवास

गर्भरेशीम ह्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत वासंती मुझुमदार ह्यांनी इंदिरा संतांविषयी सांगितले आहे की, आपला आनंद अक्का (इंदिरा संत) स्नेहीजनांना सुंदर भेटवस्तू देऊन जरी साजरा करत तरी त्या स्वतः मात्र ह्या सर्वांतून अलिप्त असत. ही अलिप्तता त्यांना त्यांच्या आयुष्यातल्या खडतर अनुभवांनी मिळवून दिली होती, मात्र त्या खुल्या मनाने बदलांचं आणि नव्या गोष्टींचं स्वागत करत. यश आणि अपयश त्या एकाच मापाने तोलत असत. एका उमद्या आणि जीवनाचा भरभरून आस्वाद घेत त्याच्याशी दोस्ती करण्याच्या त्यांच्या ह्या स्वभावधर्मामुळेच आपल्याला त्यांच्या कवितांतून गहिऱ्या, अंतरंग व्यापणाऱ्या आणि तरीही नवोन्मेशशालिनी अशा कवयित्रीचे दर्शन घडते.

सहवास' (१९४१), 'शेला' (१९५१), 'मेंदी' (१९५५), 'मृगजळ' (१९५७), 'रंगबावरी' (१९६४), 'बाहुल्या' (१९७२) 'मृण्मयी' (संपादित रमेश तेंडुलकर), 'गर्भ रेशीम' (१९८२), 'चित्कळा' (१९८९), 'वंशकुसुम' (१९९४), 'निराकार' (२०००) असा त्यांचा काव्यप्रवास आहे. १९४१ साली निघालेला 'सहवास' हा एकच संग्रह; सफल प्रीतीच्या नंतर 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी' हे दुसरे वळण आणि 'बाहुल्या', 'गर्भरेशीम', 'चित्कळा', 'वंशकुसुम' आणि 'निराकार' हे तिसरे!

इंदिराबाईंच्या 'शेला'-१९५१, 'मेंदी'-१९५५, 'रंगबावरी'-१९६४ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य शासनाचे पुरस्कार लाभले आहेत.

'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहाला तसेच 'घुंघुरवाळा' या लोकसाहित्यावरील संपादित पुस्तकासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. १९९५ मधल्या जनस्थान पुरस्काराच्या (नाशिक १९९५) त्या मानकरी ठरल्या.

१९७८ मध्ये कऱ्हाड येथे महाराष्ट्र राज्य कवयित्री संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. वयाच्या ८६व्या वर्षी बेळगाव येथे त्यांचे निधन झाले.

## क्लिक...क्लिक...!




मुरुड : येथील समुद्र किनाऱ्यावरील आनंद मेळा खूपच लोकप्रिय ठरत आहे. (छाया : संजय करडे)

## आरोग्य प्रहर

# पोटदुखीकडे दुर्लक्ष करू नका! कारण आणि उपचार जाणून घ्या

गॅस, अपचन, अतिसार किंवा अन्नाची ऍलर्जी ही पोटदुखीची सामान्य कारणे आहेत ज्यांचा घरगुती उपचारांनी उपचार केला जाऊ शकतो. सामान्य पोटदुखी देखील काही



वेळात स्वतःच बरी होते. परंतु सतत दुखणे, किंवा तीक्ष्ण ओटीपोटात दुखणे, पोटदुखीसह ताप याकडे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही. जेवणानंतर लगेचच पोटदुखी, गॅस किंवा अपचन होण्याचे एक कारण इरिटेबल बोवेल सिंड्रोम असू शकते. पोटात खडे, अल्सर अशा समस्या असल्या तरी खाल्ल्यानंतर पोटात दुखणे होते. पोटदुखी हे कोलन कॅन्सर आणि एबडोमिनल ऑर्टिक एन्युरिझम सारख्या समस्यांचे लक्षण आहे. अशाच काही आरोग्याशी संबंधित समस्यांबद्दल जाणून घ्या -

इरिटेबल बोवेल सिंड्रोममुळे अन्न पचण्यात अडचण येते आणि पोटदुखी होते. त्यामुळे पोट फुगणे, गॅस आणि मळमळ होण्याची तक्रार असते. हा एक जुनाट आजार आहे, ज्यामध्ये उपचार बराच काळ टिकतो हा ऍसिड रिफ्लक्स आहे ज्यामुळे छातीत जळजळ, ओटीपोटात दुखणे आणि मळमळ सारखे त्रास होतात आणि वेळेवर उपचार न केल्यास गंभीर आजार होऊ शकतात. वेळेवर उपचार केल्यास गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स रोगापासून मुक्ती मिळू शकते.

स्टमक फ्लू हा जीवाणू संसर्ग किंवा विषाणूमुळे होऊ शकतो. वैद्यकीय भाषेत याला गॅस्ट्रोइंटेस्टाइनल डिसीज म्हणतात, जेवणानंतर लगेच पोटदुखी, उलट्या, जुलाब होणे ही त्याची लक्षणे आहेत. साधारणपणे दोन ते तीन दिवसांच्या उपचारानंतर हा आजार बरा होतो. बराच काळ हा त्रास बरा झाला नाही तर इरिटेबल बाउल सिंड्रोम होऊ शकतो. बॅक्टेरियाचा संसर्ग आणि औषधांचा जास्त वापर केल्याने पेप्टिक अल्सर किंवा अल्सर होऊ शकतो, ज्यामुळे पोटात जळजळ, वेदना आणि गॅस होतो. वेळेत उपचार न केल्यास स्थिती गंभीर होऊ शकते.

युरिन इन्फेक्शन हे बॅक्टेरियाच्या संसर्गाचे मुख्य कारण आहे, त्यामुळे खालच्या ओटीपोटात सूज आणि वेदना होण्याची समस्या आहे. युरिनरी इन्फेक्शन हे देखील किडनीशी संबंधित समस्यांचे लक्षण असू शकते, वेळेवर उपचार न मिळाल्याने ते किडनी निकामी होण्याचे कारण असू शकते. या मुळे लघवीला वास येतो. पित्ताच्या खड्ड्यामुळे पोटाच्या उजव्या बाजूला तीव्र वेदना होतात, काही वेळा ही वेदना खांद्यावर आणि पाठी पर्यंत ही पसरते. हे खडे पित्ताशयात आढळतात, ते कोलेस्टेरॉल आणि पिगमेंट स्टोन असे दोन प्रकारचे असतात. यावर वेळीच उपचार न केल्यास ही समस्या गंभीर बनू शकते.

# आंबेनळी घाटातील दुरुस्तीच्या कामांना वेग

## आज वाहतूक आठ तास राहणार बंद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा आणि सातारा जिल्ह्याला जोडणारा सर्वात जुना आंबेनळी घाटातील दुरूस्तीच्या कामांना वेग आला आहे. त्यामुळे बुधवारी (दि. ४) सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आठ तास घाट वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती महाबळेश्वरचे सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता अ. श. देशपांडे यांनी दिली.

पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यान असलेला आंबेनळी घाटात २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे ठिकठिकाणी मोठमोठे दगड आणि मातीचा गाळ कोसळून मोऱ्यांचे तसेच रस्त्याचे नुकसान झाले. त्यानंतर तब्बल दोन महिन्यांनी प्रथम रायगड विभागाकडून एकेरी वाहतुकीसाठी रस्ता खुला करण्यात आला आणि घाटरस्ता दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग महाबळेश्वरकडून सुरू राहिले.



छाया : शैलेश पालकर

सद्यस्थितीत पारफाटच्यापासून महाबळेश्वरलगतच्या मेटतळे गावापर्यंतच्या घाटरस्त्यातील मोऱ्यांच्या कामात रस्ता फोडून काँक्रीटचे पाईप जमिनीमध्ये गाडण्याचे काम बुधवारी आठ तासात युद्धपातळीवर करण्यात येणार असून यामुळे पोलादपूर ते प्रतापगडपर्यंत वाहतूक सुरू राहणार असली, तर पारफाट्यापासून महाबळेश्वरपर्यंत वाहतूक सुरू राहणार नसल्याने संपूर्ण आंबेनळी घाटातील वाहतूक बंद करण्यात येणार असल्याचे या वेळी सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता अधिकारी अ. श. देशपांडे यांनी सांगितले.

यासंदर्भात महाबळेश्वर पोलीस, महाड, श्रीवर्धन, मुंबई, रोहा, पुणे, सातारा येथील एसटी वाहतूकही बंद करण्यासंदर्भात पूर्वसूचना देण्यात आल्या असून उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग पोलादपूर तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता वाई तसेच वनक्षेत्रपाल वनविभाग महाबळेश्वर यांना महाबळेश्वर सार्वजनिक उपविभागीय अभियंता अधिकारी अ. श. देशपांडे यांनी नोटीसा बजावून बुधवारी आंबेनळी घाटातील वाहतूक बंद करण्यासंदर्भात कळविले आहे.

### मॉर्निंग वॉक बेतले जीवावर

# अज्ञात वाहनाच्या धडकेने एकाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ येथील प्रथितयश डॉ. अशोक हरी कर्वे यांचा सोमवारी (दि. २) पहाटेच्या वेळी अज्ञात वाहनाच्या धडकेने मृत्यू झाला. मॉर्निंग वॉकवरून परतत असताना कर्वे यांना धडक देऊन वाहनचालक पळून गेला. नेरळ पोलिसांनी स्थानिक परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे.



८० वर्षीय डॉ. कर्वे हे सोमवारी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास नेरळ-कर्जत रस्त्याकडे मॉर्निंग वॉकसाठी गेले होते. त्यावेळी मागून येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर काही मिनिटांतच ही घटना इतर नागरिकांना समजली. त्यांचा मृतदेहाचे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले आणि त्यानंतर नेरळ येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना असा परिवार आहे. या अपघाताची तक्रार डॉ. हेमंत शेवाळे यांनी पोलिसांत दिली असून पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर हे अधिक तपास करीत असून अपघात घडला, त्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहेत.

## रायगडात पारा घसरला

**अलिबाग** : रायगड जिल्ह्यात गेल्या आठवडाभरापासून पारा घसरल्याने नागरिक गुलाबी थंडीचा आता आनंद घेत आहेत.

सकाळच्या वेळी धुके व गुलाबी थंडी असल्याने मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. त्याचप्रमाणे उबदार कपड्यांना मागणी वाढली आहे.

## मेंदडी येथून विवाहिता बेपत्ता

**म्हसळा : प्रतिनिधी**

मेंदडी येथील किशोरी रामा पाटील (वय २०) ही विवाहिता २१ डिसेंबर २०२२पासून बेपत्ता असल्याची तक्रार म्हसळा पोलिसांत महिलेचे वडील रामा रामचंद्र पाटील (वय ५५ रा. मेंदडी) यांनी म्हसळा पोलीस ठाण्यात दिली आहे.

महिला शौचालयाला जाते सांगून गेली ती अद्यापही परत आली नसल्याचे वडिलांनी आपल्या तक्रारीत सांगितले. बेपत्ता महिलेची उंची पाच फूट, चेहरा उभट, जांभळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस परिधान केला आहे. या महिलेबाबत कोणालाही माहिती मिळाल्यास म्हसळा पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ६६ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५- २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किमंत | इसारा/ बयाणा रक्कम | ई- निविदा संधाची किमंत | काम पूर्ण करण्याचा कालावधी ( पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रा म मा १७ ते नागोठणे फाटा ते एसटी स्थानक ते प्रा. आ. केंद्र प्रतिमा ४९ कि.मी. ०/०० ते २/०० सुधारणा करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ९४६१५०२ | ९५००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | देवळे करंजे लाहुलसे रस्ता ग्रा.मा. १५४ कि.मी. ०/०० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ६४१९८८५ | ६५००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ३ | बोरज फाटा देवळे करंजे दाभीळ रस्ता ग्रा.मा. १५५कि.मी. ०/० ते ३/५०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ६१११७५४ | ६२००० | ११८०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| ४ | पितळवाडी केवनळे अंबेमाची रस्ता ग्रा.मा. २७ कि.मी. ०/० ते ३/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ४८४०१५५ | ४९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ५ | लोहारे तुभे ते तुभेखाडा रस्ता इजिमा १५९ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | ३३३११३५ | ४००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ६ | लोहारे से लोहारे खोड ते तालुका हद्द रस्ता मध्ये सुधारणा करणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | २८३१३२० | २९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | पालविल रस्ता ग्रा.मा. १०४ कि.मी. ०/०० ते १०/६०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४.०४) | २२५०८७७ | २३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | 'माटवण मोहोल्ला जोडमार्ग रस्ता ग्रा.मा. ३६ कि.मी. ०/०० तं १/५०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड (५०५४,०४) | २२१५५८३ | २३००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | किनेश्वर ते किनेश्वर वाडी रस्ता ग्रा.मा. ४१ कि.मी. ०/० ते १/०० तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | २१९१९६७ | २२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | नागांव करंजाडी विन्हेरे तुळशीखिंड रस्ता रा.मा. १७२ कि.मी. १२/०० मध्ये काँक्रीट गटारचे बांधकाम करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | १६९४३९४ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | ढालकाठी निगडे गोठवली रस्ता प्र.जि.मा. ६५ कि.मी. ४/१०० मध्ये मोरीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३) | १६७००५५ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १२ | मौजे सवाद येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (आ. स्था. वि.) | १६९०२१६ | १७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | कापडे पितळावाडी ते घागरकोड रस्ता ग्रा.मा. १४५ कि.मी. ०/०० ते ०/५०० मध्ये सुधारणा करणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. (५०५४, ०४) | १४६३५८२ | १५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १४ | रोहा येथील मुख्य न्यायालयीन इमारतीची विशेष दुरूस्ती करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड. (२२१६) | ३३५०२४५ | ३४००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |

**ई निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | **दिनांक. ०४/०१/२०२३** (सकाळी १०.०० पासून) ते **दिनांक ते ११/०१/२०२३** वेळ : १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दि. १३/०१/२०२२ वेळ ११.०० वाजता. |

**टिप :-**

परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरूस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र. मवि/लेशा/निविदा/५४०९**
**दिनांक : २९/१२/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा. बां.) विभाग, महाड**

# कर्जत भाजपकडून अजित पवार यांचा निषेध



**कर्जत : प्रतिनिधी**

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द काढल्याबद्दल अजित पवार यांच्या वक्तव्याचा निषेध कर्जत भाजपच्या वतीने करण्यात आला. लोकमान्य टिळक चौकात कार्यकर्त्यांनी अजित पवार, सुषमा अंधारे, जितेंद्र आव्हाड यांच्या निषेधार्थ घोषणा दिल्या.

हिवाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अपशब्द वापरले. त्यामुळे लोकमान्य टिळक चौकात तालुकाध्यक्ष मंगेश म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. या वेळी रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे, तालुका सरचिटणीस संजय कराळे, ॲड. हृषीकेश जोशी, महिला मोर्चा तालुकाध्यक्षा स्नेहा गोगटे, युवक कार्यकर्ते किरण ठाकरे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष प्रमोद पाटील, किसान मोर्चा तालुकाध्यक्ष शिरीष कदम, सोशल मीडिया रायगड जिल्हा समन्वयक गायत्री परांजपे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस प्रदेश खेडकर, दिनेश भरकले, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, जेष्ठ कार्यकर्ते विनायक पवार, विजय कुलकर्णी, सुनील पाटील, विभाग अध्यक्ष योगेश घारे, केशव तरे आदी उपस्थित होते.

## काकाने पुतणीवर केला कोयत्याने हल्ला

### महाडमध्ये जमिनीच्या वादातून घटना

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील मांघरूण येथील वडिलोपार्जित जमिनीच्या वादातून एका व्यक्तीने आपल्या पुतणीवर कोयत्याने हल्ला केल्याने ती गंभीर जखमी झाली आहे.




संगीत तुकाराम शिंदे (रा. मांघरूण) या आपल्या राहत्या घरी पायरीवर बसल्या होत्या. त्या वेळी त्यांचा सावत्र चुलता शांताराम गेणु शिंदे हा त्या ठिकाणी आला आणि वडिलोपार्जित जमिनीच्या हिश्शाची मागणी करीत संगीता यांना शिविगाळी करू लागला. त्यानंतर त्याने हातात असलेल्या कोयत्याने चार वेळा डोक्यावर वार करून ठार मारण्याचा प्रयत्न केला.

या हल्ल्यात संगीता या गंभीर जखमी झाल्या आहेत. ही घटना सोमवारी (दि. २) दुपारी घडली. आरोपी शांताराम शिंदे यांच्याविरोधात महाड अद्योगिक क्षेत्र पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि. एम. एस. आंधळे करीत आहेत.

**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीरात सूचना क्र.६ सन- २०२२/२३**

दिनांक ३/१/२०२३

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामाच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं./ मा.स. दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जलजीवन मिशन योजनेच्या पाणीपुरवठा करिता गुळसुंदे, लाडीवली आकुळवाडी येथे एकूण ४ मिटर बसविणे. | रु.१५१५३५/- ठराव नं.७८/११ दि.०२/१२/२०२२ | १५१५/- | ५००/- | १३/०१/२०२३ | १ महिना |
| २ | प्रा. शाळा गुळसुंदे येथे ४ खोल्यांना लाईट फिटिंग करणे. | रु. ६१७२५/- ठराव नं.८६/२ दि.३०/१२/२०२२ | ६१७/- | ३००/- | १३/०१/२०२३ | १ महिना |

१. निविदा मिळणेकरिता दि. ०४/०१/२०२३ ते ०६/०१/२०२३ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२. अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दिनाक ०९/०१/२०२३ ते १२/०१/२०२३ (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. भरलेल्या सिलबंद निविदा दि. १३/०१/२०२३ रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील. दि.१३/०१/२०२३ रोजी दुपारी १ वाजता समक्ष उघडणेत येतील.
**४. अधिकृत/ नोंदणीकृत ठेकेदाराचीच निविदा स्वीकारण्यात येईल / ग्राह्य धरली जाईल.**
५. इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने / रोखीने)
६. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
८. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
९. निविदा फॉर्म किंमत नापरतावा राहील.
१०. नियमाप्रमाणे आयकर व GST भरावी लागेल.
११. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, १% लेबर इन्शुरन्स, १% उपकर बिलातून कपात केली जाईल.
१२. २% GST ग्रा. प. कट करील तर १६% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१३. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्याकडून २% ऐवजी ५% कपात करून घेण्यात येईल.
१४. वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबंधितास जबाबदार राहावे लागेल.
१५. झालेल्या तांत्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. (अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल.)
१६. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१७. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१८. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१९. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
२०. काम पूर्ण करणेपूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाही.
२१. सोबत दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.
२२. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२३. ज्याची निविदा मंजूर होईल ती व्यक्ती निविदा उघडण्याच्या वेळी हजर नसल्यास सदर निविदा नामंजूर करणेत येईल. याची नोंद घेणे.
२४. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
**२५. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.**
२६. मंजूर काम अंदाजपत्रकाप्रमाणे करणेत यावे कोणाचेही तोंडी सांगण्यावरून वाढीव काम केल्यास वाढीव रक्कम दिली जाणार नाही.
२७. ठेकेदाराने केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२८. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणेबाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील.
२९. एक किंवा सर्व निविदा नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
३०. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**हरिश्चंद्र बांडे**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**निविदा सूचना क्रमांक ६७ सन २०२२-२३**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो. ता. महाड, जिल्हा रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ - २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक ०६/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक १३/०१/२०२३ रोजी १८.०० वाजेपर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक १६/०१/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक १६/०१/२०२३ रोजी ११.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे लाखपाले मधली आळी ता. माणगांव येथे साकव बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४६७७ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| २ | मौजे लाखपाले ता. माणगांव श्री मुकूंद पाथरे ते विठठल रूख्मिणी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला गटार बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ६४७४७१ | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | माणगांव येथील नांदवी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची दुरूस्ती करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ८३४३३४ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | गोरेगांव येथील शासकीय विश्रामगृहाची (डाव्या बाजूस) आवार भिंत बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ६८४८४० | ७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | गोरेगांव येथील शासकीय विश्रामगृहाची (मागील बाजूस) आवार भिंत बांधणे तालुका माणगांव, जिल्हा रायगड. **(२०५९)** | ८३४६०० | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | बारसगांव शिवथर रस्ता प्रजिमा ७० कि.मी. १३ / २३० मध्ये मोरीचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ७९२६०८ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मौजे बल्हे ग्रुप.ग्रा. पं. चिंचवली तर्फे आतोणे ता. रोहा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४४६३ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ८ | मौजे हंडेवाडी ग्रुप.ग्रा.पं.चिंचवली तर्फे अतोणे ता. रोहा येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. **(डोंगरी)** | ४०४४६३ | ५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग आठ व वरील |
| ९ | ग्रामपंचायत नागोठणे अंतर्गत नागोठणे जोगेश्वरी नगर येथे संरक्षण भिंत बांधणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | ८०९३९१ | ९००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | पोलादपूर वाई सुरूर रस्ता रा.मा. १३९ कि.मी. ० / २०० वरील पूलाच्या जाग्रवर नदीपात्रातील ॲप्रण बांधणे. तसेच नदीपात्रातील नाला सुस्थितीत करणे तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. **(रस्ते पुरहानी दुरूस्ती कार्यक्रम सन २०२२-२३)** | ७७७६६८ | ८००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १. तपशिलवार निविदा सुचना https//mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५४१०**
**दिनांक : २९/१२/२०२२**

विमाका/कोवि/२०२२-२०२३/२२८

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# ‘पीएम स्वनिधी’ काटेकोरपणे राबविण्याचे आदेश

## नवी मुंबई महापालिकेच्या बैठकीत आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अर्थात पीएम स्वनिधी योजनेमध्ये नवी मुंबई महापालिकेला ४ नोव्हेंबरच्या शासकीय बैठकीत दिलेले उद्दिष्ट पूर्णत्वाच्या दृष्टीने प्रत्येक विभाग अधिकाऱ्याने अधिक गतिमान कार्यवाही करुन प्रत्येकी किमान २०० पथविक्रेत्यांची तत्परतेने नोंदणी करावी व आपले उद्दिष्ट पूर्ण करण्याची काटेकोर दक्षता घ्यावी, असे निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्त (अतिरिक्त कार्यभार) अभिजित बांगर यांनी पीएम स्वनिधीच्या आढावा बैठकीवेळी दिले.

यामध्ये बँकांची महत्त्वाची भूमिका असून शासकीय निर्देशानुसार स्थानिक विभाग अधिकारी तथा सहायक आयुक्त यांच्यामार्फत एलओआर वितरीत झाल्यानंतर बँकांनी झिरो बॅलन्स अकाऊंट उघडून पथविक्रेत्यांना १०,००० रुपये कर्ज रक्कम वितरणाची कार्यवाही करावी असेही आयुक्तांनी निर्देशित केले.


(संग्रहीत छायाचित्र)

कर्ज वितरण प्रक्रियेत बँकांकडे अर्ज प्रलंबित असल्याच्या पार्श्वभूमीवर या बैठकीमध्ये लीड बँकेचे मुख्य व्यवस्थापक नितीन भारती तसेच नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील विविध बँकांच्या व्यवस्थापकांना सहभागी करून घेण्यात आले होते. त्याचप्रमाणे शासनाच्या पीएम स्वनिधी राज्य समन्वयक ऋचा तवकर व रोहित लाहोटी उपस्थित होते. नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज गरड व समाज विकास विभागाचे उपायुक्त दादासाहेब चाबुकस्वार आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महापालिका आयुक्तांनी पीएम स्वनिधी अंतर्गत झालेल्या कामाचा विभागनिहाय आढावा घेतला. हातावर पोट असणाऱ्या पथविक्रेत्यांच्या दृष्टीने या विनातारण कर्जाचे महत्त्व ओळखून पथविक्रेत्यांची गरज यामुळे पूर्ण होत आहे, याची जाणीव ठेवावी आणि अधिकाधिक पथविक्रेत्यांना या योजनेचा लाभ घेता येईल अशा प्रकारे कार्यवाही करावी, असे त्यांनी निर्देशित केले. आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विभाग अधिकाऱ्याने योग्य नियोजन करावे व तशाप्रकारे अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांना कामाचे वाटप करावे अशाही सूचना आयुक्तांनी या वेळी दिल्या.

पीएम स्वनिधी योजनेच्या माध्यमातून पहिल्यांदा १०,००० रुपये इतके खेळते भांडवल कर्ज बँकांमार्फत उपलब्ध करून दिले जात असून हे कर्ज १२ महिन्यांच्या कालावधीत फेडल्यानंतर २०,००० रुपये रकमेचे कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. हे कर्ज १८ महिन्यांच्या कालावधीत फेडल्यानंतर त्यांना ३६ महिने कालावधीकरीता ५०,००० रुपये रकमेचे कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.

या योजनेच्या पुढील दुसऱ्या टप्प्यात ‘स्वनिधी से समृध्दी’ ही योजना राबविली जात असून त्या अंतर्गत प्रधानमंत्री जीवनज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जनधन योजना व रुपे कार्ड, इमारत व इमारत बांधकाम अंतर्गत नोंदणीकरण, प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, एक राष्ट्र एक रेशनकार्ड योजना, जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदन योजना अशा आठ योजनांचा लाभ उपलब्ध करुन दिला जात आहे. त्याचीही माहिती व्यापक स्वरूपात प्रसारित करण्याचे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

**श्रमिकांना आपुलकीचा आर्थिक आधार देणाऱ्या पीएम स्वनिधी योजनेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभाग अधिकारी यांनी संबंधित बँकांशी समन्वय राखून कर्ज वितरण कामाला गती देण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.**

**–अभिजित बांगर,**
**आयुक्त (अतिरिक्त कार्यभार),**
**नवी मुंबई पालिका**

# १६० मद्यपी चालकांवर दंडात्मक कारवाई


(संग्रहीत छायाचित्र)

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

थर्टीफर्स्टच्या निमित्ताने राबवलेल्या ड्रंक ॲण्ड ड्राईव्हच्या मोहिमेत मद्यप्राशन करून वाहन चालवणारे १६० तळीराम पोलिसांच्या हाती लागले आहेत. या सर्वांवर पोलिसांनी दंडात्मक कारवाई कली असून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शेकडो वाहन चालकांवरही कारवाई करण्यात आली आहे.

दोन वर्षे कोरोनाचे सावट असल्यामुळे थर्टीफर्स्ट आणि नववर्षाच्या पार्ट्यांवर शासनाकडून निर्बंध घालण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांनी मागील दोन वर्षे थर्टीफर्स्ट आणि नववर्ष साधेपणाने साजरे केले होते; मात्र यंदा कोरोनाचे निर्बंध नसल्याने मोठ्या जल्लोषात आणि धूमधडाक्यात नववर्ष साजरे होण्याची शक्यता असल्याने नवी मुंबई पोलिसांनी तीन हजारांपेक्षा अधिक पोलिसांचा बंदोबस्त ठेवला होता. तसेच महामार्गावरील टोलनाके, शहरातील महत्त्वाचे चौक, सिग्नल, जंक्शन अशा विविध ठिकाणी नाकेबंदी लावण्यात आली होती. त्यामुळे शहरात थर्टी फर्स्टच्या मध्यरात्री कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडली नाही.

नवी मुंबई पोलिसांनी थर्टी फर्स्टच्या बंदोबस्तादरम्यान नाकाबंदी करून मद्य पिऊन वाहन चालवणारे वाहनचालक आणि भरधाव वाहने चालवणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केली. याचबरोबर विनाहेल्मेट फिरणारे, सिट बेल्ट न लावता फिरणारे, तसेच दुचाकीवरून ट्रिपल सीट फिरणाऱ्या शेकडो चालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे, असे वाहतूक विभागोच पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी सांगितले.

# १२ जानेवारीला उरणमध्ये बेरोजगार युवकांचा मेळावा

**उरण : बातमीदार**

जेएनपीटी टाऊनशिप येथे युवकांच्या नोकऱ्या संदर्भात एका महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून १२ जानेवारी २०२३ रोजी मल्टीपर्पज हॉल, टाऊनशिप, उरण येथे दुपारी ३ वाजता बेरोजगार युवकांचा मेळावा घेण्याचा निर्धार करण्यात आला.

कॉ. भूषण पाटील, सुधाकर पाटील, संतोष पवार, दिनेश घरत, राजेंद्र मढवी, प्रमोद ठाकूर, जितेंद्र ठाकूर, शेखर पाटील, अरविंद, चेतन गायकवाड, प्राध्यापक राजेंद्र मढवी, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. एल. बी. पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

या मेळाव्यासाठी प्रकल्पबाधित (सेझ) बेलपाडा, करळ, सावरखार, सोनारी, जसखार या गावाच्या सेझ कमिट्या व सर्व सरपंच आणि इच्छुक सर्वपक्षीय नेते मंडळींना बेरोजगार युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. हे सर्व बेरोजगार युवकांना मार्गदर्शन करणार आहेत. या रोजगार मेळाव्याचा लाभ जास्तीत जास्त बेरोजगार युवकांनी घ्यावा यासाठी मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन प्रा. एल. बी. पाटील यांनी केले आहे.

# गुळसुंदे येथे विद्यार्थांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिर

**रसायनी : प्रतिनिधी**

गाडगीळ गुरुजी सामाजिक व शैक्षणिक संस्था गुळसुंदे व शंकरा आय इन्स्टिट्यूट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने तुंगारतन विभाग विद्यामंदिर गुळसुंदे येथे विद्यार्थांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिर नुकतेच झाले.

या वेळी साडेचारशे विद्यार्थांची तपासणी करण्यात आली.सदर चिकित्सेअंती बाधित विद्यार्थांना मोफत चष्मे तसेच डोळ्याचे काही गंभीर अजार उद्भवल्यास त्या संदर्भात ही मोफत इलाज करण्यात येणार आहे. या शिबिरात शंकरा आय इन्स्टिट्यूटच्या वतीने रोहीणी मॅडम व सहकारी डॉ. सपना शर्मा, डॉ. शेरीश मुल्ला, डॉ.अकसा उपस्थित होत्या.



कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मीनेश गाडगीळ, सदस्य महेश गाडगीळ, निखील गाडगीळ तसेच विद्यालयाचे सल्लागार सखाराम पाटील, भाई लाड, गुळसुंदे ग्रामस्थ चौधरी, मुख्याध्यापक कांबळे सर तसेच शिक्षक वर्ग उपस्थित होते. शंकरा आय इन्स्टिट्यूचे डमीन ऑफीसर डॉ. कापसे यांचे विशेष सहकार्य या कार्यक्रमाला लाभले. मीशन रोशनी यांच्या अंतर्गत हा कार्यक्रम झाला.



**पनवेल : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मंगळवारी सर्वत्र साजरी करण्यात आली. त्यानिमित्त करंजाडे ग्रामपंचायतीमध्ये भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत सावित्रीबाई फुलेंना अभिवादन करण्यात आले. या वेळी जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, पनवेल पं. स. माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, समिना साठी, शांताराम पाटील, प्रीती सहारे, देवकु वाघे, नंदू भोईर, बिपीन गायकवाड, आतिष साबळे, सुरज शेलार, सुनील भोईर, तुषार नागे, प्रिया फडके आदी उपस्थित होते.**

# पनवेल फेस्टीव्हलमध्ये पारंपरिक वेशभूषेचा फॅशन शो

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या पनवेल फेस्टीव्हलमध्ये नववर्षाच्या पूर्वसंध्येला (३१ डिसेंबर) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्राच्या पारंपारिक वेशभेषूच्या फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन महापालिकेच्या वतीने करण्यात आले येत आहे. पनवेल फेस्टीव्हल हाही या कार्यक्रमामधील एक उपक्रम असून यामध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी उपायुक्त विठ्ठल डाके, रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष राजेंद्र मोरे तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेलचे सर्व सदस्य, पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

खांदेश्वर रेल्वे स्थानकाजवळील सिडको मैदानात पनवेल महापालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या यांच्या संयुक्त विद्यमाने २३ डिसेंबर ते १ जानेवारीदरम्यान पनवेल फेस्टीव्हल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी पनवेल महापालिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहे तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. या निमित्ताने दहा दिवस भरगच्च सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या महोत्सवामध्ये करण्यात आले होते.

नुकतेच या महोत्सवामध्ये नववर्षाच्या पूर्वसंध्येला स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने फॅशन शोचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये रोटरीयन महिलांनी महाराष्ट्राची पारंपारिक वेशभूषा परिधान करून राज्याची लोक संस्कृती दाखविली.

याबरोबरच या महोत्सवामध्ये विविध राज्याची नृत्य संस्कृती दाखविणारा नृत्य रंग, लावणी कार्यक्रम, हास्य कवी संमेलन, महाराष्ट्राची लोकधारा, भारतीय संस्कृती आणि शिल्पकलेची माहिती सांगणारा नृत्याचा कार्यक्रम तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्यातून तरूणांना संदेश देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम, ‘मोक्ष रॉक बँड’ अशा विविध कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते.

या महोत्सवामध्ये भव्य रंगमंचासहित प्रीमियम स्टॉल, स्थानिक वस्तुची विक्री करणारे स्टॉल्स, प्रदर्शने असे जवळपास विविध २००हून अधिक स्टॉल, ५०हून अधिक फूड स्टॉल्स, भव्य आकाश पाळणे उभारण्यात आले होते. त्याचबरोबर विविध स्पर्धा आणि कार्यशाळासुद्धा या महोत्सवामध्ये घेतल्या गेल्या.




# ‘कवींनी सजग होऊन जग जगवावे, गाजवावे’

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या शनिवारी होणाऱ्या कविता डॉट कॉमच्या मासिक काव्य मैफिलमध्ये ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे यांनी नव कवींना कविता लिहावी, वाचावी, गावी आणि ऐकवावी,हे सांगत असतानाच कविता कशी गातात,सादर करतात,हे स्वतः आपल्या कविता रसिक प्रेक्षकांना सांगून..,आपल्या मनोगतातून कवींना आश्वस्थ केले.

सरत्या वर्षाच्या शेवटच्या महिन्याच्या शेवटच्या शनिवारी नवी मुंबईतील संवाद नात्यांचा कविता डॉट कॉम हा नवकवींना संधी उपलब्ध करून देणारा एक हक्काचा विचारपीठ ठरत आहे. विचारपीठावरून अनेक नवकवींनी कविता सादर केल्या. या मासिक संमेलनात प्रमुख अतिथी म्हणून नवी मुंबईचे ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे उपस्थित होते. तसेच छाया



मेढेकर, साधना वाणी या देखील उपस्थित होत्या. सोबतच प्रा. सुधीर थळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे दृष्टीहिन असलेल्या शारदा विनेरकर यांनी कविता सादर करीत सगळ्यांचे लक्ष वेधले. त्याचबरोबर इतर बालकांनी स्वरचित तसेच अन्य कवींच्या कविता सादर केल्या. पुण्याकडून आलेले चंद्रकांत जोगदंड, जना पुणेकर या तमाशा कलावंतानीदेखील स्वरचित रचना सादर करीत सामाजिक प्रबोधन केले. निर्मिती सूत्रधार प्रा. रवींद्र पाटील यांनी सध्या कवी मंडळी घरात, दारात, अंगणात येऊन फक्त एकमेकास ऐकतात, दाद देतात, एकमेकांस टाळ्या देतात आणि प्रसारमाध्यमातून फोटो सेशन करून जी प्रसिध्दी मिळवतात ती सिध्दी नसून उद्यासाठी जणू रद्दी ठरते. म्हणून कवींनी दुसऱ्यास, तिसऱ्यास दरवेळी कविता ऐकवली पाहिजे. किटीपार्टी सारखी संमेलने न घेता कवींनो बाहेर पडा,उडा अड मत व्यक्त केले.

कवी जितेंद्र लाड यांनी कविता ही नितळ चांदणं आणि मनाचे गोंदणं असून.., उद्याचं देशाचं नांदण असल्याचे सांगून, आपण दुसऱ्यास ऐकले पाहिजे असे नमूद केले. नारायण लांडगे आणि शंकर गोपाळे यांनी सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली. वैभव व्हाडी यांनी आभार व्यक्त केले.

# उरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.



अकाउन्टन्सी विभाग प्रमुख के. ए. शामा यांच्या हस्ते प्रतिमापुजन करून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या अभिवादन कार्यक्रमात भुगोल विभागप्रमुख प्रा. आनंद गायकवाड यांनी सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष, स्त्री षिक्षणाचा प्रसार याविषयीची त्यांची तळमळ यावर भाष्य केले.

या वेळी आय.क्यु.एस.सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व एन. एस. एस.च्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी मानले.

# नवी मुंबई महापालिका मुख्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

देशातील पहिल्या स्त्री शिक्षिका, मुख्याध्यापिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले.

या वेळी इस्टेट मॅनेजर अशोक अहिरे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात व विलास मलुष्टे, शिक्षण विस्तार अधिकारी उज्वला बारघरे आणि इतर अधिकारी, कर्मचारी त्यातही महिला कर्मचारी सावित्रीबाईंना अभिवादन करण्यासाठी ’आम्ही सावित्रीच्या लेकी’ म्हणत मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## निवडक

### ‘आदर्श’च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**अलिबाग :** आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या २०२३ सालाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील व संस्थापक सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष कैलास जगे, संचालक सतीश प्रधान, अनंत म्हात्रे, विलाप सरतांडेल, जगदीश पाटील, सुरेश गावंड, भगवान वेटकोळी, रामभाऊ गोरीवले, महेश चव्हाण, श्रीकांत ओसवाल उपस्थित होते.

### जवाहर नवोदय विद्यालयात विज्ञान प्रदर्शन



**माणगाव :** जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे सोमवारी (दि. २) पेस सेटिंग उपक्रमांतर्गत विज्ञान, गणित व पुस्तकालय प्रदर्शनाचे आयोजन प्राचार्य के. वाय. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या वेळी ग. रा. मेहता विद्यालय व डी. आर. पवार इंग्लिश मिडियम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाचा लाभ घेतला. या वेळी मुख्याध्यापिका भावना पोटफोडे, शिक्षक ठेंगील, मोकल, ठोकल, सारिका मेथा, स्वाती शिंदे, आयेशा खान व श्रद्धा गुरव या विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होत्या. या प्रदर्शनाच्या आयोजनासाठी विद्यालयातील विज्ञान शिक्षक ए. बी. पाटील, शिवानी पाठक, विष्णू दत्ता, बंकट गवई, संतोष चिंचकर, सतीश जमदाडे, विवेक पाटील आणि विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक गणेश आदोडे यांचे सहकार्य लावले.

### पिंगोडे येथे श्रमसंस्कार शिबिर

**नागोठणे :** स्वात्रंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त प्लास्टिकमुक्त भारत या थीमवर आधारित कोएसो आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचा समारोप पिंगोडे येथे झाला. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पिगोंडे ग्रामपंचायत हद्दीत स्वच्छता अभियान, निर्मलग्राम, सर्वांगीण ग्रामविकास, पाणी आडवा पाणी जिरवा उपक्रम तसेच अंधश्रद्धा निर्मूलन, एड्स जनजागृती, स्त्री सबलिकरण, स्त्रियांवर होणारे अत्याचार, पर्यावरण संवर्धन, व्यक्तिमत्व विकास अशा विविध विषयांवर पथनाट्य सादर केले. या शिबिरास पिगोंडे ग्रामपंचायत सरपंच संतोष कोळी, उपसरपंच कांचन माळी, अनिल काळे, महाविद्यालयाचे प्राचार्य संदेश गुरव, डॉ. सोनल जैन, हरिश्चन्द्र तेलंगे,बळीराम बडे, नाना बडे, नंदिनी बडे, गीता पाटील, रंजना माळी, कुसुम बावकर आदींनी भेट दिली.

### रोह्यात महिलांसाठी योग प्रशिक्षण

**रोहे** : रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिला व मुलींकरीता मोफत योग प्रशिक्षण व सराव वर्ग रविवार (दि. १)पासून म्हाडा कॉलनी येथील वुमन्स क्लब हाऊस या ठिकाणी सुरू करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी योग प्रशिक्षणाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. हा योगवर्ग तीन महिन्यांकरीता सुरू करण्यात आला असून परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी सहभागी होऊन यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ. धीरज किशोर चव्हाण यांनी केले आहे.

# पडसरे येथील पूल बनलाय धोकादायक

## संरक्षक कठडे तुटून सळ्या बाहेर, अपघाताची भीती

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील महागाव ग्रामपंचायत हद्दीतील पडसरे गावाकडे जाणारा ओढ्यावरील पूल अत्यंत जीर्ण व धोकादायक बनला आहे. पडसरे येथे रहदारीसाठी हा एकमेव पूल आहे. त्यामुळे एखादा मोठा अपघात होण्यापूर्वी पुलाची डागडुजी करण्याची मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

पडसरे आदिवासी आश्रमशाळा या ठिकाणी असून सुमारे ५०० विद्यार्थी येथे येतात. मुलांच्या जेवणाची व्यवस्था या शाळेत होत असल्याने यासाठी लागणारे रेशन साहित्याची याच पुलावरून वाहतूक होत असते. त्यामुळे हा पूल अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवाय या पुलावरून महागाव, कवेळे, हातोंड, चंदरगाव, ताडगाव, लोळगे वाडी, एकलघर, शिरसे वाडी, चरफळवाडी आदींसह गावे व कातकरवाडी येथील नागरिकांची, विद्यार्थ्यांची याच पुलावरून ये-जा सुरू असते. पडसरे धबधबा हा पर्यटकांसाठी आकर्षण ठरतोय. रायगडसह मुंबई, पुणे व अन्य भागातील पर्यटक याच पुलाच्या रस्त्यालगत असलेल्या धबधब्याच्या मनमुराद आनंद लुटण्यासाठी येत असतात. या पुलावर सतत वाहनांची वर्दळ सुरू असते, मात्र आजघडीला हा पूल शेवटची घटका मोजतोय.

पुलाचे संरक्षण कठडे तुटले आहेत. सळ्या बाहेर निघाल्या आहेत. पुलाचे खांब मोडकळीस आलेत, ते केव्हाही तुटून पूल कोसळू शकतो, अशी चिंताजनक परिस्थिती आहे. एकावेळी अरुंद असलेल्या पुलावरून दोन वाहने पूल ओलांडताना सळ्यांनी अपघात होण्याची तसेच वाहन पुलाखाली कोसळण्याची दाट शक्यता आहे. एखादी जीवघेणी दुर्घटना घडण्यापूर्वी पडसरे पुलाचे नव्याने मजबूत बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी केली जात आहे.





(छाया : धम्मशील सावंत)

> **पडसरे पूल अखरेची घटका मोजतोय. पूल चहू बाजूंनी मोडकळीस आला आहे. येथील आदिवासी आश्रम शाळेला दैनंदिन भोजनाचे साहित्य देण्यासाठी या पुलावरून दररोज वाहन न्यावे लागते. या पुलावर आलो की, उरात धडकी भरते, पूल कधीही कोसळेल अशी पुलाची दुरावस्था झालीय. प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन पूल सुस्थितीत आणावा.**
>
> **–सत्यवान दत्ताराम शिंदे, वाहनचालक**

## अलिबाग तालुका भाजपकडून अजित पवारांचा निषेध



**अलिबाग : प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी वादग्रस्त विधान केल्याबद्दल विरोधी पक्षनेते अजित पवार यांचा अलिबाग तालुका भारतीय जनता पक्षाकडून मंगळवारी (दि. ३) निषेध करण्यात आला.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आदेशानुसार ३ जानेवारी रोजी भाजप अलिबाग तालुक्याच्या वतीने रायगड जिल्हा कार्यालय अलिबाग येथे अजित पवार यांच्याविरोधात धिक्कार आंदोलन करण्यात आले. या वेळी अजित पवार यांच्या विरोधात घोषणा देऊन त्यांचे फोटो फाडून तुडविण्यात आले.

भाजप प्रदेश सदस्य सतिश लेले, भाजपा अलिबाग तालुकाध्यक्ष परशुराम म्हात्रे, कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष रवींद्र पाटील, जिल्हा सचिव समिर राणे, तालुका सरचिटणीस संतोष पाटील, प्रशांत पाटील, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस शैलेश नाईक, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आलाप मढवी, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस निखिल चव्हाण युवा मोर्चा शहराध्यक्ष आशिष तरे, सांस्कृतिक सेल तालुकाध्यक्ष शिवदास पाटील, विधानसभा मिडिया प्रमुख जान्हवी पारेख, पंकज अंजारा, तालुका चिटणीस अमित पाटील, शरद थळे, शहापूर ग्रामपंचायत सदस्य मितेश पाटील, चरी ग्रामपंचायत सदस्य रोहित जाधव, रामराज विभाग अध्यक्ष अजिंक्य पाटील, तालुका उपाध्यक्ष निखिल चव्हाण, ओबीसी सेल अलिबाग तालुकाध्यक्ष अशोक वारगे, सांस्कृतिक सेल जिल्हा संयोजक केदार आठवले, कार्यकर्ते मोरेश्वर पाटील, ज्येष्ठ नेते शंकरशेठ भगत सहभागी झाले होते.

## माणगावात ६५ हजारांचा ऐवज लंपास

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावपासून एक किमी अंतरावर असणाऱ्या ढालघर फाटा येथील अशनाज कॉम्प्लेक्समध्ये फिर्यादींच्या घरातील ६५ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून अज्ञात चोर पसार झाला आहे. ही घटना सोमवारी (दि. २) सकाळी ९.१५ ते सायंकाळी ७.१५ वाजण्याच्या दरम्यान घडली. याबाबतची फिर्याद दीपिका विलास पवार (वय २८) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

**अज्ञात चोरटा पसार**

याबाबत माणगाव पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी दीपिका पवार व त्यांचे पती हे नेहमीप्रमाणे बँकेत नोकरीस जाताना घराचे खिडक्या व दरवाजे लॉक करून गेले असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादींच्या घराच्या मागून खिडकीच्या वाटे घरात प्रवेश केला. फिर्यादींचे पतीने बेडरुमध्ये बेडच्या ड्रॉवरमध्ये ठेवलेली एक ९१६ कॅरेटची सोन्याची चेन अंदाजे किंमत ६५ हजार रुपये व एक पोट्रोनिक्स कंपनीचा लहान ब्लूटूथ स्पीकर ५०० रुपये असा एकूण ६५ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज चोरून अज्ञात चोरटा पसार झाला आहे.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार जे. डी. कदम हे करीत आहेत.

## विठ्ठलनगर परिसरात घरफोडी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत विठ्ठलनगर परिसरात रविवारी (दि. १) तीन- चार घरांत चोऱ्या करून चोरट्यांनी डल्ला मारला. याबाबत पोलिसांकडे प्राथमिक माहिती आहे, मात्र ज्यांच्या घरी चोरी झाली आहे ते अद्याप घरी पोहचले नसल्याने नक्की काय आणि किती रुपयांची चोरी झाली आहे, हे समोर आले नाही.

थर्टीफर्स्टच्या रात्री चोरट्यांनी विठ्ठलनगर परिसरामधील तीन ते चार घरांचे कुलूप मौल्यवान वस्तू घेऊन पळ काढला आहे. आपले शेजारी बाहेरगावी गेले आहेत, मात्र त्यांच्या घराचा दरवाज तोडला आहे, हे लक्षात आल्यानंतर शेजाऱ्यांनी त्यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून कळवले.

त्यांच्या नातेवाईकांन पोलिसांना याबाबत घटनेची माहिती दिली. माहीती मिळतात पोलीस घटनास्थळी पोहोचले.



**अलिबाग : रायगड जिल्हा माहिती कार्यालयाने गेल्या वर्षभरात एक हजार १०१ बातम्या तसेच विविध विषयांवरील लेख प्रकाशित केल्याबद्दल अलिबाग प्रेस असोसिएशनचे प्रकाश सोनवडेकर, राजन वेलकर, हर्षद कशाळकर आणि भारत रांजणकर यांनी जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे व जिल्हा माहिती कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचेही अभिनंदन केले.**

## कवयित्री चौगुलेंना संमेलनाचे निमंत्रण

**माणगाव** : ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था, पुणे शाखेतर्फे होणाऱ्या पहिल्या फातिमाबी शेख मराठी साहित्य संमेलनास माणगाव येथील कवियित्री सायराबानू वजीर चौगुले यांना निमंत्रित कवी म्हणून निमंत्रण देण्यात आले आहे.



कवयित्री चौगुले यांच्या अनेक कविता व लेख प्रसिद्ध झाले आहेत.

## आंबेवाडी आरोग्य केंद्राला कायाकल्प पुरस्कार जाहीर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्यदायी वातावरण त्याचप्रमाणे स्वच्छ व निर्मल वातावरण निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान स्तरावरील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीला जाहीर झाला आहे.

२ ऑक्टोंबर २०१४ला महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छ भारत मिशनला देशात सुरुवात झाली. नागरिकांना सार्वजनिक आरोग्य संदर्भात स्वच्छ व चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात या उदात्त उद्देशाने कायाकल्प पुरस्कार देण्यात येतो. प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी संस्थेमध्ये कायाकल्प योजनेचे सर्व निकष त्याचप्रमाणे आरोग्य सेवेतील गुणवत्ता, सोयीसुविधा, उत्कृष्ट आरोग्य सेवा त्याचप्रमाणे बायोमेडिकल उत्कृष्ट व्यवस्थापन या सर्व बाबी सातत्याने प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडीने राबविल्याचे आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश वाघ यांनी सांगितले.

योजना वेळोवेळी राबविण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अभय ससाणे यांचे मार्गदर्शन असते.




## वाघोशी शाळेतील विद्यार्थिनी बनल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आदर्श केंद्रशाळा वाघोशी येथे मंगळवारी (दि. ३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी शाळेतील लहान विद्यार्थिनी सावित्रीबाई यांचा पेहराव करून आल्या होत्या व त्यांनी सावित्रीबाईंची माहिती दिली. सावित्री माई यांच्या त्याग व समर्पण याची जाणीव ठेवावी, असे आवाहन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक राजेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधित्व करीत तन्वी देशमुख हिने अध्यक्षपद स्वीकारले, तसेच शाळेच्या शिक्षिका किर्ती लामदाडे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा खडतर जीवनपट उलगडला. विद्यार्थ्यांनी रोज वाचन करावे, तसेच शेजारी कोणी निरक्षर असतील तर त्यांना अक्षराची ओळख करून साक्षर करावे तरच आपण सावित्रीबाईंची जयंती साजरी केल्याचे समाधान मिळेल असेदेखील सांगितले.

या कार्यक्रमास मुख्याध्यापक राजेश जाधव, शिक्षिका किर्ती लामदाडे, सुवर्णा घोडे, वंचित बहुजन आघाडीचे रायगड जिल्हा युवक अध्यक्ष अमित गायकवाड आणि विद्यार्थी उपस्थित होते.



## हुतात्मा स्मारके कायम प्रेरणा देतात –आमदार महेंद्र थोरवे

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात कर्जत तालुक्यातील अनेक क्रांतिकारकांनी सहभाग घेतला. त्यांचे कार्य आपल्याला सदैव प्रेरणा देत असते. मानिवली आणि माथेरान येथील हुतात्मा स्मारक हे आपल्या तालुक्याचे स्फूर्तिस्थान आहे, असे प्रतिपादन कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

मानिवली येथील हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांच्या स्मारकाठिकाणी सिद्धगड बलिदान दिनाचा स्मृतिदिन सोहळा आयोजित करण्यात आला होता. आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते हुतात्मा हिराजी पाटील यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.



तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी पुष्पचक्र वाहिले. या वेळी राजिप माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, माजी सदस्य अरविंद पाटील, पं. स. माजी सभापती राहुल विशे, अमर मिसाळ, रवींद्र झांजे, पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर, जि. प. उपअभियंता सुरेश इंगळे, पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी सुरेखा हिरवे, विस्तार अधिकारी उज्ज्वला भोसले आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात हुतात्मा भाई कोतवाल यांचे नातेवाईक कुटुंबीय तसेच अन्य स्वातंत्र्यसैनिक यांचे कुटुंबीय यांचा सत्कार करण्यात आला.

ज्येष्ठ शेतकरी कृषिरत्न शेखर भडसावळे, विठ्ठल पाटील यांच्यासह अनुसूया जामघरे, जयराम गवळी, रमेश गवळी यांचा सन्मान करण्यात आला. रायगड भूषण नयन गवळी यांनी देशभक्तीपर गीते सादर केली.

# जयदेव उनाडकटने रचला इतिहास




**राजकोट : वृत्तसंस्था**

क्रिकेटपटू जयदेव उनाडकटने मंगळवारी (दि. ३) प्रथम श्रेणीतील कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली. रणजी ट्रॉफी स्पर्धेत सौराष्ट्रकडून खेळताना कर्णधार उनाडकटने दिल्लीविरुद्ध हॅट्ट्रिकसह आठ बळी घेतले. डावाच्या पहिल्याच षटकात हॅट्ट्रिक घेणारा तो रणजी ट्रॉफी इतिहासातील पहिला गोलंदाज ठरला आहे.

भारतीय संघाला आपली पुढील कसोटी मालिका ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळायची आहे. अशा स्थितीत उनाडकटची कामगिरी निवडकर्त्यांना प्रभावित करेल, तसेच त्याने 'कांगारू' संघाची चिंता वाढवली आहे. उनाडकटला बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत खेळण्याची संधी मिळाली, जिथे त्याने तीन विकेट घेतल्या होत्या.

या सामन्यात दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. उनाडकटने १२ षटकांत ३९ धावा देत आठ बळी घेतले. गेल्या मोसमातील उपविजेता सौराष्ट्रने या मोसमात आतापर्यंत तीन सामने खेळले असून १२ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. दरम्यान, ५३ धावांवर आठ विकेट पडल्यानंतर हृतिक शोकीन आणि शिवांक वशिष्ठ यांनी डाव सांभाळला. त्यांनी ८० धावा जोडून धावफलक १००च्या पुढे नेला. शिवांक ६८ चेंडूंत ३८ धावा करून उनाडकटचा बळी ठरला.

पुढच्याच चेंडूवर उनाडकटने कुलदीप यादवला शून्यावर बाद करून दिल्लीला बरोबरीत रोखले. ३५ षटकांत १३३ धावा करून संपूर्ण संघ ऑलआऊट झाला. विकेट पडण्याच्या दरम्यान शोकीनने चांगली खेळी साकारली. त्याने ९० चेंडूत ६८ धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला.

# कर्णधारानंतर टीम इंडियाचा प्रशिक्षकही बदलणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) नव्या वर्षात टीम इंडियामध्ये मोठे बदल केले आहेत. बीसीसीआयने नवीन वर्षात रोहित आता भारताच्या टी-२० संघात दिसणार नाही, असे म्हटले जात आहे. रोहितनंतर आता प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याकडे संघाचे प्रशिक्षकपद नसेल, असे संकेत बीसीसीआयने आपल्या बैठकीनंतर दिले आहेत.

द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली भारताचे सात कर्णधार पाहायला मिळाले. त्यानंतर आशिया चषक आणि टी-२० विश्वचषकसारख्या मोठ्या स्पर्धांमध्ये द्रविडच्या मार्गदर्शनाखाली भारताला चांगली कामगिरी करता आली नाही. द्रविड जेव्हा संघाबरोबर नसायचे तेव्हा लक्ष्मण हे प्रशिक्षकाच्या भूमिकेत असायचे, पण आता बीसीसीआयने द्रविड यांना संघाबाहेर करण्याचा निर्णय घेतला आहे. बीसीसीआयने आता पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी बीसीसीआयने भारताच्या टी-२० संघाचा कर्णधार बदलला आहे. रोहितच्या जागी आता हार्दिक पांड्याला भारतीय संघाचे कर्णधार केले आहे. त्यानंतर बीसीसीआय आता टी-२० संघाचे प्रशिक्षकही बदलणार असल्याचे समोर येत आहे.

पुढच्या वर्षी वनडे विश्वचषक खेळवण्यात येणार आहे. त्यासाठी द्रविडला वनडे संघावर लक्ष केंद्रित करण्यासाठी बीसीसीआयने सांगितले आहे. एवढ्या कमी वेळात बीसीसीआयला एखाद्या व्यक्तीला टी-२० च्या प्रशिक्षकपदी विराजमान करायचे असेल तर त्यासाठी संघातील माहिती असणे गरजेचे आहे. त्यामुळे आता भारताच्या टी-२० संघाच्या प्रशिक्षकपदी भारतीय व्यक्ती विराजमान होणार आहे.

### लक्ष्मण यांचे नाव चर्चेत



भारताच्या टी-२० संघाच्या प्रशिक्षकपदी आता व्हीव्हीएस लक्ष्मण यांना विराजमान करण्याच्या तयारीत बीसीसीआय आहे, कारण लक्ष्मण हे बऱ्याच कालावधीपासून भारताच्या खेळाडूंना ओळखत आहेत. हंगामी प्रशिक्षक म्हणून त्यांनी भारतीय संघाचे काम पाहिले आहे. लक्ष्मण जेव्हा प्रशिक्षक होते तेव्हा हार्दिकच त्या संघांचा कर्णधार होता. त्यामुळे हार्दिक आणि लक्ष्मण यांचे चांगलेच सूर जुळल्याचे समोर येत आहे. बीसीसीआय लवकरच या गोष्टीची घोषणा करेल, असे म्हटले जात आहे.

### निवड समितीसाठी चेतन शर्मांना दुसरी टर्म मिळण्याची शक्यता

टी-२० विश्वचषक २०२२मधील खराब कामगिरीनंतर चेतन शर्मांच्या नेतृत्वाखालील भारतीय निवड समितीने हकालपट्टी केल्याच्या वृत्तांदरम्यान नवीन माहिती समोर येत आहे. चेतन शर्मा यांनी पुन्हा एकदा याच पदासाठी अर्ज केल्याचे सांगण्यात येत आहे. क्रिकेट सल्लागार समिती (सीएसी) त्यांना दुसरी टर्म देण्याचा विचार करीत आहे. शर्मासह असे एकूण सात भारतीय क्रिकेटपटू आहेत ज्यांनी सीएसीसमोर मुलाखती दिल्या आहेत. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ सूत्राने नाव न सांगण्याच्या अटीवर पीटीआयला सांगितले की, चेतन अध्यक्षपदासाठी आवडते आहेत.

# उरणचे रमेश पाटील यांची मि. इंडिया स्पर्धेसाठी निवड



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील दिघोडे गावचे सुपुत्र शरीरसौष्ठव रमेश पाटील यांची मिस्टर इंडिया या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

रमेश पाटील यांनी महाराष्ट्र श्री, द्रोणागिरी श्री टायटल चैम्पियन ऑफ चॅम्पियन, वेलर क्लासिक आदी स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले आहे. ते स्टॉम फिटनेस कोप्रोली येथे व्यायामाचे व फिटनेसचे ट्रेनिंग घेतात. त्यांना आर्यन पाटील, आंतरराष्ट्रीय बॉडीबिल्डर तथा कोच सिद्धेश शिंदे, निशिकांत घरत, आशिष पाटील, अनिकेत पाटील यांचे नेहमी मार्गदर्शन लाभत असते. पाटील यांची मि. इंडिया शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# पॉवरलिफ्टिंगमध्ये मुकुंद आहेरला सुवर्णपदक

## चार राष्ट्रीय विक्रम करणारा राज्यातील पहिलाच खेळाडू

**नाशिक : प्रतिनिधी**

तमिळनाडू येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय युथ, वरिष्ठ व कनिष्ठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत जय भवानी व्यायामशाळेच्या मुकुंद आहेर याने ऐतिहासिक कामगिरी करीत राष्ट्रीय वरिष्ठ व कनिष्ठ गटाच्या वेटलिफ्टिंग प्रकारात कनिष्ठ गटात तीन, तर वरिष्ठ गटात एक असे चार राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करत तीन सुवर्णपदके पटकावली.

राष्ट्रीय स्पर्धेत ५५ किलो वजनी गटात सहभागी होत मुकुंदने स्नॅचमध्ये ११४ किलो वजन उचलून वरिष्ठ व कनिष्ठ या दोन्ही वयोगटात दोन नवीन राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केले. स्नॅचमध्ये नवीन राष्ट्रीय विक्रमी कामगिरी करताना ज्युनियरमध्ये १०८ किलोचा व सिनियरमध्ये ११४ किलोचे वजन उचलत विक्रमी कामगिरी बजावली.

क्लिन जर्कमध्येसुद्धा ज्युनिअरचा १३९ किलोचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढीत १४० किलो वजन उचलून ज्युनिअरमध्ये नवीन राष्ट्रीय विक्रम आपल्या नावावर केला. २४४ किलो एकूण वजन उचलण्याचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत २५४ किलो वजन उचलत ज्युनिअर गटामध्ये नवीन विक्रम प्रस्थापित केला. ४० किलो मुलींच्या युथ वजनी गटात वीणा आहेर हिने आपल्या पहिल्याच राष्ट्रीय स्पर्धेत स्नॅचमध्ये ५७ किलो व क्लिनजर्कमध्ये ६६ किलो असे एकूण १२३ किलो वजन उचलून रौप्यपदक पटकावले. आकांक्षा व्यवहारेने राष्ट्रीय स्पर्धेत ४५ किलो वजनी गटात पहिल्यांदा सहभाग घेत ६५ किलो स्नॅच व ७९ किलो क्लिनजर्क असे १४४ किलो वजन उचलून रौप्यपदक पटकावले.

# वीर सावरकर बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंचे सुयश

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वीर सावरकर बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील मुष्टियुद्ध स्पर्धेत सुयश प्राप्त केले आहे. त्या स्पर्धेत सावरकर बॉक्सिंग क्लबच्या खेळाडूंनी ११ सुवर्णपदके आणि तीन रौप्यपदके पटकावली आहेत.



धारावी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये २६ ते २९ डिसेंबरदरम्यान आयोजित डीएसओ बॉक्सिंग टुर्नामेंटमध्ये आदित्य गुप्ता, अवंतिका केवट, जागृती बोथ, रिया सुतार, सोनल गुप्ता, मार्दवी भोसले, गुरुराज चुटके, कौशल केवट, दर्पण साळुंके, साहिल कुंचीकोरवे, अमोल दुलगज यांनी सुवर्णपदक पटकाविले. त्याचप्रमाणे आदिती सुर्वे, दर्शना पाटील आणि रुजुला महाराव यांनी रौप्यपदक जिंकले. या स्पर्धांमधील सर्व सुवर्णपदक विजेते आता पालघर जिल्ह्यात होणाऱ्या डीएसओ डिव्हिजन बॉक्सिंग टुर्नामेंटध्ये सहभागी होतील, अशी माहिती प्रशिक्षक राजन जोथाडी यांनी दिली.

# तळाघर येथील कबड्डी स्पर्धेत धाटाव संघ विजेता



**धाटाव : प्रतिनिधी**

गावदेवी क्रीडा मंडळ तळाघर आयोजित धाटाव विभागीय कबड्डी स्पर्धेत नवयुवक धाटाव संघाने काळभैरव बोरघर संघावर सहज विजय संपादित करून प्रथम क्रमांक पटकविला.

या स्पर्धेत द्वितीय क्रमांक काळभैरव बोरघर, तृतीय गावदेवी रोठ बुद्रुक, चतुर्थ क्रमांक गावदेवी रोठ बुद्रुक यांनी मिळविले. विजेत्या संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक देण्यात आले. मालिकावीर धाटाव संघाचा अजय मोरे, उत्कृष्ट चढाईपटू रोठ बुद्रुक संघाचा आदित्य मोरे, उत्कृष्ट पकड करणारा बोरघर संघाचा प्रज्योत भगत आणि पब्लिक हिरो रोठ बुद्रुक संघाचा रोहित कांबळे, गेम चेंजर बोरघर संघाचा प्रथमेश भगत ठरला. त्यांनाही बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेला विभागातील दानशूर व्यक्तिमत्व मुकेश भोकटे, भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड अध्यक्ष अमित घाग, पत्रकार राजेंद्र जाधव तसेच विठ्ठल मोरे, सचिन मोरे, वाशी ग्रामपंचायत उपसरपंच अरविंद मगर आदींनी सदिच्छा भेट दिली व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.




# टीम इंडियाला सक्तीची केलेली काय आहे डेक्सा टेस्ट?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) आढावा बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्याबरोबरच राष्ट्रीय संघात स्थान मिळवण्यासाठी खेळाडूंना यो-यो चाचणी तसेच डेक्सा चाचणी अनिवार्य करण्याचा निर्णयही बीसीसीआयने घेतला आहे.



यो-यो चाचणी टीम इंडियासाठी नवीन नाही. २०१९च्या विश्वचषकापूर्वीच याची सुरुवात झाली होती. या चाचणीदरम्यान खेळाडूंना ७.३० मिनिटांत दोन किमी धावणे बंधनकारक आहे, तसेच या चाचणीत पास होण्यासाठी खेळाडूंना १७ गुण मिळवणे अनिवार्य आहे. कोरोनामुळे ही चाचणी बंद करण्यात आली होती, मात्र आशिया चषक आणि टी-२० विश्वचषकादरम्यान खेळाडूंना झालेल्या दुखापती आणि प्रदर्शनानंतर ही चाचणी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतला आहे. महत्त्वाचे म्हणजे अंबाती रायुडू, सुरेश रैना, पृथ्वी शॉ, वरुण चक्रवर्ती, संजू सॅमसन आणि मोहम्मद शमीसह अनेक खेळाडू या चाचणीत नापास झाले आहेत.

याबाबत भारतीय क्रिकेट संघाचे माजी प्रशिक्षक रामजी श्रीनिवासन म्हणाले, यो-यो चाचणीत फलंदाजांना १७ आणि वेगवान गोलंदाजांना १९ गुण प्राप्त करणे आवश्यक आहे, मात्र आता भारतीय संघाला केवळ यो-यो चाचणीवर अवलंबून राहून चालणार नाही. मी २०११मध्येच बीसीसीआय आणि एनसीएला खेळाडूंची डेस्का चाचणी करावी, अशी शिफारस केली होती. या चाचणीद्वारे शरीरातील चरबी, पातळ स्नायू, पाण्याचे प्रमाण आणि हाडांची घनता समजून घेण्यास मदत होते.

डेक्सा चाचणी ही एक प्रकारे बोन डेन्सिटी टेस्ट आहे. ही चाचणी करताना क्ष-किरण तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यादरम्यान दोन लेझन बीमद्वारे शरीराचे स्कॅनिंग केले जाते. अगदी १० मिनिटांमध्ये होणारी ही चाचणी खेळाडूंच्या फिटनेसची माहिती घेण्यासाठी अतिशय उपयोगी आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com